# मुंबई मराठी साहित्य संघ

'संघदिन शनिवार ता. २३ जुलै १९४९

महनीय प्रवक्ते



प्राचार्य धनंजय रामचंद्र गाडगीळ

एम्. ए. एम्. लिट्.

# आपलें आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य

मूल्य चार आणे.

सरस्वती, आंबेवाडी पोष्टासमीप, गिरगांव, मुंबई ४.

jn marathi - 06-04-10

# राष्ट्र वैभव

छापखाना

[ स्था. १९२९ ]

उत्तम आणि सुबक छपाईसाठीं
मुंबईंत प्रसिद्ध असलेल्या छापखान्यांत

# राष्ट्र वैभव

छापखाना आहे

पुस्तकें–मासिकें–किरकोळ कामें

व

**तीनरंगी छपाईचीं कामें**

येथें उत्तम होतात

**बुक बायंडिंग**

सुंदर आणि मजबूत होते.

टेलिफोन नंबर
३३८३४.

प्रार्थनासमाजाजवळ
गिरगांव-मुंबई ४

# आपलें आर्थिक धोरण
# व
# राजकीय भवितव्य

मित्र हो,

आज जगांत दोन तट पडले आहेत. एक पश्चिम यूरोपीय व अमेरिकी राष्ट्रांचा व दुसरा रशिया, बाल्कन राष्ट्रें व कम्युनिस्ट चीन यांचा. या दोन तटांतील एके काळचे स्नेहसंबंध पूर्णपणें दुरावले आहेत. मतभेद सारखे वाढत आहेत व दोघांतहि एका जगांत मित्रत्वाने अगर एकोप्याने नव्हे तर निदान, प्रत्यक्ष भांडणाशिवाय नांदतां येईल किंवा नाही, याबद्दल दिवसेंदिवस जास्त शंका वाटूं लागली आहे. समाजवादी वा साम्यवादी राष्ट्रें व व्यक्तिवादी भांडवलशाही राष्ट्रें यांचा केव्हांना केव्हां तरी जागतिक वर्चस्वासाठीं झगडा होणारच हा मार्क्स-लेनिन-स्टालिन वादी रशी तत्त्वज्ञांचा ठाम सिद्धांत आहे. इंग्रज-अमेरिकी राष्ट्रांतूनहि याच सिद्धांताचा उलट्या बाजूने पुरस्कार अलीकडे केला जातांना आढळतो. हा झगडा विश्वव्यापी आहे, त्यांतून कोणताहि देश अगर समाज वगळला जाणार नाही. तसेंच जो तात्त्विक वाद या झगड्याच्या मुळाशीं आहे, त्याचा समाजजीवनाच्या प्रत्येक अंगाशी निकट संबंध आहे. त्याअर्थी आज जगांतील कोणत्याहि समाजाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक जीवनाचा विचार करूं म्हटलें तर या मूलभूत वादास धरूनच तो विचार करावा लागतो. हिंदुस्थानांतील राजकीय पुढाऱ्यांस एके काळीं आपण या कलहांत न पडतां तटस्थतेने वागूं असें वाटत होतें. पण या भ्रमाचा निरास लवकरच झाला. आज हिंदुस्थानांतील सत्तारूढ पक्षाने इंग्रजांशीं आपल्या देशाचे संबंध दृढतर केले असून, अमेरिकेशीं आर्थिक संबंध उत्तरोत्तर वाढविण्याचे प्रयत्न

सुरू केले आहेत. तेव्हां आज तरी आपला देश यूरोपीय-अमेरिकी गटाचा सदस्य बनला आहे याबाबत शंका येण्याचें कारण नाही. हिंदुस्थान सरकारचें आर्थिक व राजकीय धोरणहि अमेरिकी गटाच्या सभासदत्वास अनुरूप असेंच गेल्या दोन वर्षांत बनत गेलें आहे. या धोरणाचा विकास कसा होत गेला व त्याचा परिणाम काय होण्याचा संभव आहे याविषयीं कांहीं विचार आपणांपुढे मांडण्याचें मीं आज योजिलें आहे.

## युद्धकालीन परिस्थिती

प्रचलित जागतिक वाद मूलतः अर्थव्यवस्थेबाबतचा आहे. एका पक्षाचें म्हणणें असें कीं व्यक्तिसाहसास पूर्ण वाव देऊन, शासनसंस्थेचें नियंत्रण अत्यल्प राखणें ही सर्वोत्कृष्ट योजना; तर दुसऱ्या पक्षाच्या मतें पूर्णपणें नियोजित अर्थव्यवहार समाजहिताच्या दृष्टीने चालविणें, हाच एक इष्ट मार्ग. यास जोडूनच एक राजकीय वाद आहे. पहिल्या पक्षाचे धुरीण आपणास व्यक्तिस्वातंत्र्याचे व लोकशाहीचे पुरस्कर्ते म्हणवितात, तर दुसऱ्या पक्षाच्या मतें व्यक्तिस्वातंत्र्याचें फाजिल स्तोम खऱ्या लोकशाहीच्या प्रगतीस मारक व निर्नियोजित अर्थव्यवस्थेंतील लोकशाही बेगडी आहे. तात्विक वादांत शिरण्याचें हें स्थल नव्हे. परंतु कांहीं सूचक घटना व गोष्टी यांकडे लक्ष दिल्यास वादाचें खरें स्वरूप लक्षांत येऊं लागेल. नियोजित अर्थव्यवस्थेच्या आग्रहाच्या बुडाशीं व्यक्तिगत आर्थिक विषमता शक्य तो कमी करण्याचा आग्रह आहे. आर्थिक विषमता अनिष्ट आहे, प्रत्येक व्यक्तीच्या राहणीचें मान विवक्षित किमान मर्यादेहून कमी असूं नये, धनसंचय थोड्या हातीं झाला म्हणजे आर्थिक सत्ता अल्पसंख्यांकांचे हातीं जाऊन ते आपल्या हिताचे दृष्टीने अर्थव्यवस्था राबवितात, इत्यादि अनेक सिद्धांतांवर हा आग्रह आधारलेला आहे. उलट पक्षाची मूळ भूमिका, अर्थविचारांत समाजविचार अप्रस्तुत आहे, असें मानण्याची होती. व्यक्तिसाहसाचे जोरावर समाजाची साहजिक प्रगति होते व व्यक्तिव्यक्तींचे स्पर्धेंत प्रत्येकास योग्य तें अर्थव्यवस्थेंत स्थान प्राप्त होतें, असा या पक्षाचा विश्वास होता. हा विश्वास गेल्या पंचवीस वर्षांत ढासळलेला दिसतो. आपोआप सर्व गोष्टी इष्टच घडून येतात ही श्रद्धा परिस्थितीने पाश्चात्य देशांतहि ओली ठरविली आहे. हिचा प्रकट उच्चार आज सहसा कोणी करतांना आढळत नाहीं. बहुजनसमाजाचे राहणीचें किमान मान गाठविणें व राखणें, हें शासन संस्थेच्या आद्य कर्तव्यापैकीं आता समजलें गेलें असून, अटलांटिक सनदेच्या चतुःसूत्रींत दारिद्र्यापासून सर्वांस मुक्त करणें या उद्दिष्टाचा समावेश करण्यांत आला आहे. म्हणून आज निर्भेळ व्यक्तिसाहसावरील जोर कमी झाला आहे. १९२९ सालानंतर जागतिक मंदी व १९३९ नंतर युद्धकालीन परिस्थिति यामुळे सरकारचें आर्थिक कर्तव्य व व्यवहार यांची सीमा प्रत्येक देशांतच फार वाढली व ती युद्धोत्तर काळांत अजून तरी फारशी कमी होऊं शकली नाहीं. सरकारी आर्थिक व्यव-

इतरेक्षत्र वाढविण्यास मुख्यतः दोन कारणें झालीं. मंदीच्या व युद्धाच्या काळांत सरकारला कांहीं गोष्टी त्वरेनें घडवून आणण्यास आर्थिक व्यवहारांत ढवळाढवळ करणें, त्याचें मोठ्या प्रमाणावर नियंत्रण करणें, यांशिवाय गत्यंतर नव्हतें. युद्ध संपल्यावरहि तेजीमंदीच्या चक्राची गति पुन्हा कशी व केव्हां सुरू होईल याची भीति व युद्धकालीन परिस्थितीचे, विशेषतः सार्वराष्ट्रीय व्यापारावर झालेले शेष परिणाम यांचें निराकरण करणें किंवा त्यांस निदान आटोक्यांत ठेवणें यांची आवश्यकता, यामुळे युद्धकाळांत सुरू केलेले उपक्रम व लादलेलीं नियंत्रणें यांत अद्याप फारसा फरक होऊं शकला नाहीं.

याहूनहि महत्त्वाचा फरक म्हणजे रूसी राज्यक्रान्तीनंतर घडून आलेलें मतपरिवर्तन अगर मूल्यपरिवर्तन. आर्थिक विषमतेचें निर्मूलन करणें हें सरकारचें आद्यकर्तव्य व फाजिल धनसंचय ही अनिष्ट गोष्ट मानूं लागण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस बळावत आहे. श्रीमंत गरीबांचा, कारखानदार मजूरांचा उपकर्ता ही भाषा हास्यास्पद वाटू लागली व श्रीमंतीचें प्रदर्शन, आर्थिक विषमतेचें प्रदर्शन, समाजस्वास्थ्याचे दृष्टीनें अहितावह ठरू लागलें. ज्या देशांत दारिद्र्य अधिक त्या देशांत या प्रवृत्तींनीं सरकारी धोरण किंवा समाजमन यांत जास्त उत्कट फरक घडवून आणला. परिणामीं, व्यक्तिसाहसावर भर देणाऱ्या गटांतील अनेक देशांत सरकारी धोरणावर आज समाजवाद अगर साम्यवाद यांचा पगडा कमी-अधिक प्रमाणांत बसलेला प्रत्यक्ष आढळून येतो. इंग्लंडसारख्या देशांत खाजगी आर्थिक व्यवहाराचा संकोच मोठ्या प्रमाणावर झाला असून, खाजगी व्यवहारावर अनेक प्रकारचीं बंधनें घातलीं आहेत. शिवाय समाजवादाचें पाऊल या देशांतून आजच्या पेक्षाहि पुढे पडण्याची शक्यता आहे.

## यूरोप-अमेरिका गटांतील देशांची परिस्थिति

स्थूल मानाने यूरोपियन-अमेरिकी गटांत श्रीमंतीच्या प्रमाणांत, परिस्थितींत खालील फरक आढळून येतात. बहुजनसमाजाचें राहणीचें किमान मान राखणें हें सरकारी आद्य कर्तव्य मानून आजार, बेकारी, वृद्धापकाल या अवस्थेंत मदत म्हणून सार्वजनिक खर्चानें तरतूद करण्याच्या योजना सर्वांसच मान्य आहेत. तसेंच मंदीच्या काळांत विशिष्ट वर्गांचें ऐन उत्पन्न खालावूं नये याकरिता शेती मालाच्या पैदाशीच्या किंमती सांवरण्याची व्यवस्था करणें इ. धोरणें अमेरिकी सरकारासहि मान्य आहेत. अमेरिकेबाहेर अनेक देशांत यापुढे जाऊन प्रमुख आर्थिक व्यवसाय सरकारच्या मालकीचे करणें वा ताब्यांत घेणें व कांहीं बाबींत प्रत्यक्ष आर्थिक नियोजन अमलांत आणणें हेंहि घडलें आहे. स्कँडिनेव्ही देश व इंग्लंड यांसारख्या यूरोपांतील श्रीमंत देशांत समाजवादाचा अंमल मोठ्या प्रमाणावर होऊन व्यक्तिगत राहणीच्या मानांतील प्रत्यक्ष विषमता फार कमी झाली आहे. अखिल देशांचें अर्थ उत्पादन-

उपभोग, क्रय-विक्रय, आयात-निर्यात इत्यादींचे ताळेबंद आगाऊ करून पूर्वयोजनेनुसार नियंत्रणाच्या साह्याने ते प्रत्यक्षांत उतरविणें येथपर्यंत सरकारी व्यवहाराचें क्षेत्र या देशांत पोंहोचलें आहे. आणि यामुळे या देशांतील लोकशाही राज्याचें बूड इतर कोणत्याहि देशांपेक्षा जास्त स्थिर दिसतें. प्रमुख धंद्यांचें राष्ट्रीयीकरण, खाजगी व्यवहारांचें कडक नियंत्रण, खाजगी उत्पन्नावर भारी कर व मजूर, शेतकरी इत्यादिकांच्या उत्पन्नांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष भर टाकण्याच्या निरनिराळ्या योजना या सर्व धोरणांचा इष्ट परिणाम या देशांत साकल्यानें घडून आलेला दिसतो. परंतु हें धोरण यशस्वी होण्यास कांही किमान श्रीमंती व समाज-स्वास्थ्य लागतात. हीं तितक्या प्रमाणांत फ्रान्स, इटलीसारख्या देशांत आज उपलब्ध नाहींत. म्हणून सारखवट आर्थिक धोरण असतांहि तितकी तुष्टि अगर शांति हे देश अनुभवीत नाहींत.

पाश्चिमात्य देशांतील समाजस्वास्थ्याचा प्रमुख मानदंड कम्युनिस्ट पक्षाचें प्राबल्य मानल्यास गरीबीच्या मानाने या देशांची उतरण लागेल असें वाटतें. अगदीं गरीब देशांत इंग्रज समाजवाद कितपत फलदायी होईल याबाबतचा प्रत्यक्ष प्रयोग अजून कोठें घडून आलेला नाहीं. खुद्द इंग्लंडमधील आर्थिक धोरणाच्या यशस्वितेचें श्रेय बऱ्याच अंशीं अमेरिकी मदतीस दिलें पाहिजे. फ्रान्स, इटली देशांतील कम्युनिस्ट पक्षाची अलीकडील पीछेहाट हीहि मार्शल योजनेचें फळ मानिली पाहिजे. याचें तात्पर्यहि हेंच कीं, परकीय मदत अगर स्वतःची योजना या कशाचेहिमुळे आर्थिक विकास झपाट्याने होऊन गरीबांची आर्थिक स्थिती उत्कटपणें सुधारूं लागण्यास आर्थिक असंतोष व कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार हीं कमी अधिक प्रमाणांत काबूत ठेवतां येतात.

## मार्शल योजनेंतील विरोधाभास

या विचाराचा विस्तार करण्यापूर्वी मार्शल योजनेच्या अंमलबजावणीच्या पोटीं जो एक विरोधाभास निर्माण झाला आहे त्याकडे लक्ष वेधलें पाहिजे. मार्शल योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे युद्धोत्तर संक्रमणावस्था सुकरतेने पार पाडण्यास यूरोपीय राष्ट्रांस मदत करून त्यांचें कम्युनिस्ट धोक्यापासून रक्षण करणें, कम्युनिस्टांपासून बचाव करणें, याचा अर्थ म्हणजे व्यक्तिसाहसावर आधारलेल्या अर्थव्यवहारास विरोधी असलेल्या तत्त्वज्ञानाचा या देशांत बीमोड करणें: हें करण्याचा मार्ग म्हणजे असंतुष्ट दरिद्र्यांचे पूर्वेकडे लागलेले डोळे, पश्चिमेकडून मोठ्या प्रमाणावर रसद पोंहोचवून तिकडे वळविणें हाच होता. पण यूरोपीय संकटांत, यूरोपास अमिरिकेने देऊं केलेल्या मदतीचा पूर्ण उपयोग अल्पावधींत करून घ्यावयाचा तर, याबाबत निश्चित पूर्वयोजना तयार केली पाहिजे व तिची तपशिलवार अंमलबजावणी प्रत्यहीं झाली पाहिजे, याकरितां आर्थिक व्यवहाराच्या प्रत्येक अंगाचें मापन, त्याच्या संकोच-विकासाच्या परिमाणाची निश्चिति व प्रत्येक अंगांतील योजना पार पाडण्या-

करितां त्या त्या अंगानें भागशः नियंत्रण हीं क्रमानुसार आलीं. सर्व घटनांचा परिपाक व सर्व योजनांचा हिशेब, यांचा अंदाज पूर्णपणें आधीं बांधतां येईलच असें नाहीं व सर्व योजना शंभर टक्के सर्वांकडून पार पडतील असेंहि नाहीं. याकरितां सर्व सहकारी राष्ट्रांच्या विचारविनिमयानें त्यांत वारंवार फेरबदल करण्याची तरतूद करणेंहि आवश्यक होतें. अशा रीतीनें मार्शल योजनेमुळें आज पश्चिम युरोपीय अर्थव्यवस्थेचें नियोजन-नियंत्रण हें पूर्वी केव्हांपेक्षांहि अधिक तपशिलवार, सर्वांगीण व बहुराष्ट्रीय होऊन बसलें आहे. मार्शल-योजना यशस्वी होऊन यूरोपची आर्थिक घडी लवकर स्थिरावल्यास कोणत्या पक्षास बळकटी येईल? अर्थव्यवहाराचा पाया अनियंत्रित व्यक्तिसाहसावर असावा या पक्षाच्या पुरस्कर्त्यांस, कीं पूर्वयोजनेनुसार आर्थिक प्रगति समाजहिताच्या दृष्टीनें शासनसंस्थेस घडवून आणतां येते व या उद्दिष्टानें नियंत्रण-नियोजन आवश्यक आहे असें म्हणणाऱ्यांस?

वरील त्रोटक विवेचनावरून असें दिसून येईल कीं, अर्थव्यवहाराबाबतच्या वादांत यूरोपीय अमेरिकी गटांत पूर्ण मतैक्य वा एकरूपता नाहीं. अमेरिकेंतील प्रभावी मत अजून बहुतांशीं व्यक्तिसाहसव्यवस्थेचा पुरस्कार करणारें आहे, तर बहुतेक यूरोपीय राष्ट्रांत कडक नियंत्रणें जारी असून स्वतःस समाजवादी म्हणविणारे पक्ष देशांदेशांत सत्तारूढ आहेत. निर्भेळ अमेरिकी व्यवस्थेचे पुरस्कर्ते आज पश्चिम-युरोपांत प्रतिगामी गणले जातात. या देशांतील लोकशाहीपुढील मुख्य पेंच म्हणजे जुन्या अर्थव्यवस्थेचे पाठिराखे प्रतिगामी पक्ष व दुसऱ्या टोंकाचे कम्युनिस्ट यांच्या दरम्यान समाजवादी-सरकारचें तारूं कसें हाकारावें हा आहे. मधला मार्ग यशस्वी होण्याची शक्यता बऱ्याच अंशीं, देशाच्या श्रीमंती-गरीबीवर अवलंबून असते. इंग्लंड व स्कँडिनेवी देश आज बरेच सुस्थितींत आहेत; फ्रान्स, इटली सुधारण्याच्या मार्गांवर आहेत अशी आशा तरी धरितां येते; पण ग्रीसमध्यें कोट्यावधी रुपयांची मदत अमेरिकेनें देऊनहि परिस्थिति सांवरण्याचीं चिन्हें निश्चित नाहींत.

## नवीन सरकारच्या तीन घोषणा

जगांतील या घडामोडी लक्षांत घरून स्वदेशांतील परिस्थितीचा कांहींसा तपशिलवार विचार आतां करूं. आपणास स्वराज्य प्राप्त होऊन जवळ जवळ दोन वर्षें झालीं. एवढ्या अवधींत आपला आर्थिक कारभार आपणच पूर्णपणें चालविला आहे. व हळूहळू हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाचें स्वरूपहि सुस्पष्ट झालें आहे. सुरवातीचे कांहीं महिने संक्रमणावस्थेचे समजावयाचे. राज्ययंत्र हातीं घेणाऱ्या पुढाऱ्यांनीं गेलीं अनेक वर्षें वेळींअवेळीं अनेक घोषणा केलेल्या होत्या; व त्यांपैकीं बऱ्याच जणांस सत्तारूढ झाल्यावर घोषित केल्यापैकीं बऱ्याच गोष्टी, आपण घडवून आणूं असें वाटत असावें. कांहीं घोषणा राज्यकारभार हातीं आल्यावरहि होत राहिल्या. उदाहरणार्थ सर्व प्रमुख धंदे सरकारी मालकीचे अल्पावधींत करावे अशी शिफारस करणारा एक काँग्रेस

समितीचा अहवाल, मुख्य प्रधानांचे सहीसकट १९४८ च्या सुरुवातीस बाहेर पडला. जुन्या घोषणांप्रमाणेंच दुसरा वारसा, लियाकतअल्लीखानांच्या अंदाजपत्रकाचा, नूतन सरकारास स्वीकारावा लागला. त्यांतहि नवीन सरकारांतील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा कांहीं भाग होताच; म्हणून त्यांतील अभिप्रेत धोरण चालू राहील अशी सार्वजनिक अपेक्षा उत्पन्न झाली होती. असें असूनहि नवीन सरकारचें बदललेलें आर्थिक धोरण लवकरच प्रकट होऊं लागलें. हें नवीन धोरण तीन प्रकारें प्रकट झालें. पहिली पायरी विनियंत्रणाची; दुसरी राष्ट्रीयीकरण दहा वर्षांनी पुढे ढकलेल्या घोषणेची व तिसरी प्रत्यक्ष उत्पन्नावरील करांचा बोजा कमी करून अप्रत्यक्ष करांची सार्वजनिक वाढ करण्याच्या धोरणाची.

## विनियंत्रणाचें धोरण

तसें पहिलें तर विनियंत्रणाच्या धोरणांत इतर सर्वच गोष्टी आल्या. नियोजित अर्थव्यवस्थेचा, नियंत्रण हा आत्मा समजला पाहिजे. योजना कागदावर कितीहि मांडल्या तरी प्रत्यक्षांत उतरविण्यास सरकारी मालकी, सरकारी ताबा अथवा किमान पक्षीं खाजगी व्यवहारावर सर्वांगीण सरकारी नियंत्रण हवें. ज्या सरकारला खाजगी अर्थव्यवहाराचें नियंत्रण करावयाचें नाहीं किंवा करिता येत नाही त्याच्या नियोजनाच्या वल्गना पोकळ ठरणारच. तेव्हां हिंदुस्थानचा पुढील आर्थिक विकास सरकारी योजनेनुसार होणार कीं तो व्यक्तिसाहसावर आधारलेला असणार याचें उत्तर नूतन सरकारने विनियंत्रणाचें धोरण जाहीर करून एकाअर्थी तावडतोब दिलें. विनियंत्रणाचा हा निर्णय अजाणता किंवा घाईने दिला गेलेला नव्हता. याची नांदी श्री. राजगोपालाचार्य यांनी १९४६ च्या ऑक्टोबरमध्ये गठित धान्यनियंत्रण परिषदेंत केली होती. तेथपासून सतत सव्वा वर्ष याबद्दल वाद सुरू होता. परंतु एका अर्थी सुरवातीपासूनच ही गोष्ट वादातीत होती असेंहि म्हणतां येईल. नियंत्रणाच्या बाजूचे सर्व दुर्बल होते. कांही अर्थशास्त्रज्ञ व सरकारी अधिकारी यांचा मुख्यत्वेंकरून विनियंत्रणास विरोध होता. तसेंच महाराष्ट्रासारख्या कांही गैर महत्त्वाच्या भागांतील जनमतहि बरेंचसें नियंत्रणास अनुकूल होतें. कारखानदारांपैकीं कांही विशेष दूरदर्शी व जुन्या वळणाचे, विनियंत्रणाचे परिणाम फारसे बरे होणार नाहीत, असें सौम्यपणें सुचवीत होते. उलटपक्षीं बहुतेक सर्व कारखानदार व व्यापारी वर्ग विनियंत्रणाच्या मोहिमेच्या आघाडीवर होता व त्यांच्या सत्तारूढ पक्षांतील प्रमुख पुढारी जनतेने विनियंत्रणाच्या बाजूने कौल द्यावा असा उघड प्रचार करीत होते. विनियंत्रण झालें त्यांहून लवकर तें घडून न येण्याचें कारण एकच; तें म्हणजे १९४७ पावेतों मंत्रिमंडळांत असलेले मुस्लिमलीगी सदस्य. यांची अडचण दूर झाल्याबरोबर विनियंत्रण लवकरच होणार हें भविष्य करण्यास ज्योतिषाची आवश्यकता नव्हती. विनियंत्रण झालें तें घाईने किंवा भिडेने झालें हें म्हणणें पूर्णपणें चुकीचें आहे. तें

बुद्धिपुरःसर करण्यांत आलें व एका विशिष्ट कारखानदार-व्यापारी गटाचा प्रभाव राजकारणावर पडल्यामुळे तें घडून आलें.

विनियंत्रण ही प्रचलित हिंदी आर्थिक धोरणाची प्रकृति समजली पाहिजे. नियंत्रण ही विकृति ही गोष्ट गेले सालीं पुनर्नियंत्रणाचा स्वीकार ज्या प्रकारें झाला त्यावरून स्पष्ट होते. पुनर्नियंत्रण स्वीकारलें ते आपद्धर्म म्हणून. तात्कालिक परिस्थिति विकोपास गेली म्हणून कांही नियंत्रणें युद्धकालांतल्याप्रमाणें पुन्हा लादलीं. पण त्या वेळेस हीं शक्य तेवढ्या लवकर काढण्यांत येतील अशाहि घोषणा करण्यांत आल्या.

## राष्ट्रीयीकरणाची पिछेहाट

राष्ट्रीयीकरणाची पीछेहाट नियंत्रणाच्या मागोमाग ओघानेच आली. ज्या सरकारला अर्थव्यवहार नियंत्रित करणें अशक्य वा अनिष्ट वाटतें, तें सरकार प्रमुख धंदे आपल्या ताब्यांत घेऊन चालविणार कसें ? राष्ट्रीयीकरण करावयाचें नाही याचा अर्थ उद्योगधंद्यांची सर्व वाढ खाजगी व्यक्ति व मंडळ्या यांस करूं द्यावयाची अगर यांच्या द्वारें करवावयाची; व या मूळ कल्पनेस अनुरूप असें सर्व आर्थिक धोरण आखावयाचें. देशाची आर्थिक प्रगति घडवून आणण्याकरितां व्यक्तिसाहसास व खाजगी व्यवहारास संपूर्ण वाव देणें हा नवीन धोरणाचा विशेष समजला पाहिजे. हिंदुस्थान सरकारास देशाची आर्थिक प्रगति थोड्या काळांत पुष्कळ घडवून आणावयाची आहे व याकरिता सरकारच्या योजनाहि अनेक आहेत. सरकारचें हें उद्दिष्ट, व या योजना व नवीन आर्थिक धोरण यांचा मेळ कितपत घालतां येईल ? प्रत्यक्ष सरकारी हुकमतीखालीं किंवा नियंत्रणाखालीं नसली तरी खाजगी भांडवलदारांच्या करवीं एखादी सरकारी योजना पार पाडणें अशक्य नाही- किंबहुना असें करण्याचाच सरकारचा मानस असावा. तेव्हां सरकारी योजना व खाजगी व्यवहार यांची सांगड घालणें कसें व कितपत शक्य आहे याकडे आता लक्ष देऊं.

## नाझी राजवटींतील अनुभव

सरकारी सर्वांगीण नियंत्रण कडक ठेवल्यास कोणतीहि सरकारी योजना खाजगी कारखानदार व व्यापारी यांमार्फत पार पाडतां येते असा नाझी जर्मनींतील अनुभव आहे. नाझी राजवटींत उद्योग अगर व्यापार सरकारी मालकीचे केल्याशिवाय मोठमोठ्या योजना केवळ सरकारी नियंत्रणानुसार घडवून आणल्या. पण हें नियंत्रण फार सूक्ष्म योजनापूर्वक केलेलें होतें आणि त्याची अंमलबजावणी फार कसोशीने व करडेपणाने होत होती. नाझी राजवटीचें आर्थिक धोरण हिंदुस्थानांत अंमलांत आणणें तत्त्वतः अशक्य नाहीं. पण त्यास लागणारा विचार किंवा निश्चय हीं आपल्या सरकारजवळ नाहींत, हें विनियंत्रणाचे वेळेस उघड झालें. औद्योगिक विकासाच्या योजना मांडतांना राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशेब काळजीपूर्वक काढावा लागतो. प्रत्येक व्यवसायांतील उत्पादनाचे व वाट उत्पन्नाचे इष्टांक ठरवून

त्यांची विभागणी सर्व दृष्टीने विचार करून करावी लागते. प्राथमिक विभागणी, चालू उपभोग्य वस्तूंचे उत्पादन किती करावयाचें व मांडवली उत्पादक वस्तूंचे उत्पादन किती करावयाचें या बाबतची असते. तपशिलवार महत्त्वाची विभागणी म्हणजे चालू उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाचा कोणता वांटा समाजांतील निरनिराळ्या वर्गांस प्राप्त करून द्यावयाचा या बाबतची. हे सर्व इष्टांक स्थूलमानाने गोळाबेरजेवरून ठरवावयाचे नसून प्रत्येक महत्त्वाच्या वस्तूची किंमत व हरतऱ्हेचें व्याज, भाडें, मजूरी इत्यादिकांचे दर यांचा हिशेब बमेस धरून काढावयाचे असतात. असें केलें असतां कोणत्याहि योजनेच्या पोटीं सर्व महत्त्वाच्या किंमतींची व दरांची निश्चिती साहजिकच येते. नाझी राजवटींतील नियोजन-नियंत्रण या स्वरूपाचें होतें. मजूरीचे किमान व कमाल दर या राजवटीने ठरविले तर त्याबरोबरच मजूराच्या राहणीच्या मानाचे सूचकांक यत्किंचितूहि न वाढवील याची खबरदारी घेतली. फार मोठ्या प्रमाणावर युद्धाची तयारी व कांहीं वर्षे प्रत्यक्ष युद्ध करूनहि आवश्यक उपभोग्य वस्तूंच्या किंमती नाझींनी फार कौशल्याने स्थिरावल्या. असें करतांना कारखानदारांच्या फायद्याला अनेकदां कात्री बसली, त्यांना आपली उत्पादनक्षमता सारखी वाढवावी लागली, ही वाढवूनहि वेळेस तोटे आले; पण योजनेच्या यशस्वितेकडे पाहून त्यांच्या ओरडीकडे नाझी राजवटीने कधीं लक्ष दिलें नाहीं. युद्धकाळांतील इंग्लंड, अमेरिका, कॅनडा वगैरे देशांतील अनुभवहि हाच होता. सरकारी योजनेनुसार उत्पादनाची वाढ करावयाची तर मजूरीचे दर, राहणीचें मान व निरनिराळ्या अवस्थेंतील वस्तूंच्या किंमती यांचे अन्योन्य संबंध निश्चित करून ते हरतऱ्हेने कायम राखणें अत्यावश्यक असतें. मजूर-वर्ग आणि कारखानदार व व्यापारी या दोन्ही पक्षांच्या मागण्या काबूंत ठेवतां न आल्या तर हें नियंत्रण अशक्य होतें.

## नियंत्रणपद्धतीचा बोजवारा

हिंदुस्थानांतील युद्धकालीन सरकारास कारखानदार-व्यापाऱ्यांना दुखविणें शक्य नव्हतें. यामुळें युद्धकाळीं ठरलेल्या अनेक प्रकारच्या मालांच्या किंमतींत मांडवली नफ्याची कुस सुरुवातीसच बेसुमार ठेवली गेली. सुरुवातीच्या बऱ्याच किंमती १९४३–४४ सालांत ठरल्या गेल्या. १९४६ साल पावेतों मजूरीचे दर व इतर किंमती चढल्यामुळे अनेक धंद्यांत फायदा थोडाबहुत घटला; आणि या सुमारास किंमती वाढवून मिळण्याची मागणी होऊं लागली. आर्थिक नियंत्रणांत किंमती ठरविणें ही बाब फार महत्त्वाची तशीच ती गुंतागुंतीची व निर्भीडपणें करावी लागण्याची. याकरिता निराळें भाव-नियंत्रण मंडळ नेमून ती करून घेण्याचा १९४७ चे सुरुवातीस प्रयत्न करण्यांत आला. मुख्यतः कॉंग्रेसपक्षाच्या धुरीणांच्या आर्थिक धोरणामुळे तो अयशस्वी झाला; आणि हिंदुस्थान सरकारला कारखानदार-व्यापारी यांच्या किफायती-वर नियंत्रण ठेवणें अशक्य आहे हें निर्विवाद ठरलें. कोळसा, लोखंड-पोलाद, सीमेंट

इत्यादि मूलभूत उत्पादन-सहाय्यक वस्तूंच्या किंमती नियंत्रित असूनहि फाजील वाढविल्या, कापडाच्या किंमतीवरील नियंत्रणहि अर्धेच ढिलें ठेवलें. मजूरी, कारखानदारांचा नफा व पदार्थांच्या किंमती यांचें समप्रमाण टिकलें नाहीं व नियंत्रण पद्धतीचा बोजवारा व दुर्लौकिक झाला.

किंमतींत वाढावा करण्याच्या उत्पादकांच्या नित्य मागणीस नकार देण्याचें मनोधैर्य सरकारांत नसलें म्हणजे किंमतींची उतरंड ढासळून अर्थव्यवहारांत घोटाळे माजण्यास वेळ लागत नाही, हा हिंदुस्थानांतील ताजा अनुभव आहे. केवळ किंमतींचें नियंत्रण करूनहि आर्थिक योजना यशस्वी होतात असें नाहीं. अनेक प्रसंगीं कोणत्या किंमतीस वस्तू विकावयाच्या अगर मजूरीचे कोणते दर असावयाचे, या बरोबर कोणत्या तऱ्हेच्या वस्तूंचें उत्पादन कोणी करावयाचें, कोणत्या कसबाचे किती कामकरी कोणत्या व्यवसायांत जावयाचे याहि गोष्टी तपशीलांत ठरवाव्या लागतात. इतर देशाच्या युद्धकालीन नियोजन-नियंत्रणांत हें नित्य परिचयाचें झालें होतें. आपल्या देशांतील या बाबतचा अलीकडील अनुभवहि अनेक दृष्टींनी उद्बोधक आहे. सार्वजनिक जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा कमी पडूं लागला व त्यांचें उत्पादन तातडतोबीने वाढविणें शक्य नसलें म्हणजे त्यांच्या किंमतींचें व वांटपाचें नियंत्रण करावें लागतें. वस्तु विशेष महत्त्वाची अगर तुटवडा फार असल्यास त्या वस्तूच्या उत्पादनाचेंहि नियंत्रण करण्याची पाळी येते. कापडाबाबत अशी पाळी १९४२ सालच्या पुढे सारखी आलेली होती, ही गोष्ट हिंदुस्थान सरकारने वेळोवेळीं मान्य केलेली आहे. सर्व कापड सरकारने नियंत्रित किंमतीस विकत घ्यावयाचें ठरविल्यानंतर कोणत्या प्रकारचें, कोणत्या दर्जाचें व किती कापड गिरण्यांनी काढावें हें ठरविणें क्रमप्राप्त होतें. किंबहुना असें केल्याखेरीज उत्पादन, अनावश्यक कापडाचें आणि शिवाय फाजील खर्चाचें होतें ही गोष्ट पदोपदीं भासत होती. उत्पादित कापडांच्या तऱ्हांची संख्या मर्यादित करून, प्रत्येक गिरणीस विशिष्ट तऱ्हांचें उत्पादन करावयास भाग पाडून प्रत्येकाच्या कार्यक्षमतेचा उच्चांक गांठण्याचा प्रयत्न करावा याला कारखानदार प्रतिनिधीहि तत्त्वतः संमति देत होते. पण प्रत्यक्षांत या दिशेने एक पाऊलहि आजवर पुढे पडूं शकलें नाही. समित्या व योजना अनेक झाल्या, पण त्या सगळ्या वांझोट्या. कापडाच्या उत्पादनांत जितका बेशिस्तपणा व अप्रामाणिकपणा आज चालू आहे तितका इतरत्र क्वचितच सांपडेल. याचें कारण नियंत्रणभाव ठरविणें वगैरे सर्व चाव्यांची जुडी खुद्द उत्पादकांचे हातींच ठेवण्यांत आली. कारखानदारांच्या इच्छेविरुद्ध वागण्याची सरकारची छाती नाही; वेळेस तसें करण्याचा आव आणल्यास कारखानदार दोन पोकळ धमक्या देऊन तो तातडतोब उतरवितात. या इतिहासाचा परिपाक आज असा झाला कीं उत्पादनक्षमता वाढविण्यास ज्यांनी मोठा नफा मिळत असतां कांही प्रयत्न केला नाही अशा गिरण्या आज 'आम्ही तोट्यांत आहों' म्हणून ओरड

करून उत्पादन यांत्रविण्याच्या धमक्या देत आहेत. अशा धमक्या दिल्या म्हणजे सरकार आपणास तूट भरून देण्याचें आश्वासन देईल अशी त्यांची अपेक्षा असावी व ती खरी ठरल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाही.

वरील विवेचनाचा सारांश असाः आर्थिक विकासाची कोणतीहि योजना अनेकांगी असते व तिच्या निरनिराळ्या अंगांचा परस्परांशी निकट व प्रमाणबद्ध संबंध असतो. आर्थिक प्रगतीची मोहीम यशस्वी व्हावयाची तर तिची चाल ठराविक दिशांनी, ठराविक मजलांनी ठराविक वेळांत झाली पाहिजे. सरकारनियंत्रित आर्थिक योजनांतहि सर्व दिशांनी अपेक्षित प्रगति होतेच असें नाहीं. पण तेथे बदललेल्या परिस्थितींत मोहिमेच्या योजनेंत इष्टावश्यक बदल करण्यास कोणीतरी जबाबदार सरसेनानी असतो. खाजगी व्यवहाराचें असें नाही. त्यास शिस्तवार फौजेपेक्षा अनेक एकांडे शिलेदार व कांही स्वतंत्र पथकें अशांच्या संमिश्र जमावाची उपमा अधिक शोभेल. वारा कसाहि सुटला व लाटा कशाहि आल्या तरी एका निश्चित स्थलाप्रत जाऊं पाहाणाऱ्या नौकेसारखी नियंत्रित नियोजन-व्यवस्था मानली तर फायद्याच्या विलोभनाच्या दरेक झुळकीबरोबर निरनिराळ्या दिशेने वळण घेणाऱ्या तारवासारखी व्यक्तिसाहसावर आधारलेली अर्थव्यवस्था असते. तात्कालिक फायद्याच्या जेवढ्या गोष्टी सरकारी योजनेंत बसत असतील तेवढ्यांच खाजगी व्यक्ति घडवून आणतील; इतरांची उपेक्षा करतील. इतकेंच नव्हे तर सरकारी योजनाबाह्य किंवा विरोधी घटना किफायतशीर असल्यास त्याहि घडून येणें हें खाजगी अर्थव्यवस्थेच्या प्रवृत्तीस धरून होईल. मच्छरदाणीच्या कापडांत एखाद्या पैचा अधिक मुनाफा मिळत असल्यास, लोकांना धोतरांची वाण कितीहि भासत असली तरी, धोतरें काढण्याकडे कोणा व्यवहाऱ्याचें लक्ष जाईल अगर जावें ! अधिकतम नफा मिळविणें हा ज्या अर्थव्यवस्थेचा धर्म तेथें त्याविरुद्ध आचरण अपेक्षणें योग्य नव्हे. खाजगी व्यापारी अगर कारखानदार यांना शिव्याशाप देण्यांत अर्थ नाहीं; त्यांचा धर्म माहीत असूनहि ते निराळें वर्तन करतील या अपेक्षेवर सरकारी आर्थिक धोरण बांधूं पाहाणारे मात्र भोळे किंवा त्यापलीकडचे समजले पाहिजेत.

यावर कांहींजण असें म्हणतील कीं हा विचार तात्विक दृष्ट्या योग्य असला तरी व्यवहारांत मधला मार्ग काढतां येणें अशक्य नाही. आर्थिक नियंत्रण नाझी राजवटी सारखें किंवा पश्चिम यूरोपांतील युद्धकालीन नियंत्रणांसारखें कडक नसलें तरी चालण्यासारखें आहे. कांही अप्रत्यक्ष नियंत्रणें व कांही प्रत्यक्ष विलोभनें वापरून सरकारी योजना शंभर टक्के नाहीं तरी बहुतांशीं अंमलांत आणतां याव्या. असा कांहींसा प्रयत्न हिंदुस्थान सरकार आजहि करीत आहे; पण तो यशस्वी ठरेल असें वाटत नाही. परदेशाहून विशिष्ट प्रकारची यांत्रिक सामुग्री आणण्यास पैसा व परवानगी देणें व इतरांस नाही म्हणणें हें सरकार आज करीत आहे. तसेंच कांही प्रकारचें उत्पादन उच्च श्रेणीचें समजून त्यास लागणारा माल व वाहतूक यांचा पुरवठा सरकार करतें.

पण यांत्रिक सामुग्री आणण्यास परवानगी व हुंडणावळ दिली तरी ती सर्व योग्य रीतीने वापरून हवी ती सामुग्री येईल असेंच नाहीं; व ती आल्यावरहि तिचा उपयोग, सरकारला हवा त्या दिशेने व हवा त्या पद्धतीने होईल असेंहि नाही. तसेंच सरकारी प्रत्यक्ष मदत देऊं केली तरी त्यामुळे विशिष्ट व्यवहारांचा विकास किंवा संकोच ठराविक प्रमाणांत, निश्चित वेळांत होईल याचीहि खात्री नाही. तात्कालिक फायद्यांवर हेलकावणाऱ्या व्यवहारांस कोणत्याच प्रकारचा नियम लावता येत नाही. जलद वाहतुकीकरितां उपलब्ध करून दिलेले मालाचे डबे, किंमतीच्या वाढीची अपेक्षा असल्यास, व्यापारी कोठारासारखे वापरून वाहतुकींत घोटाळे उत्पन्न करतात, अशी तक्रार वाहतुक मंत्र्यांनी एका परिषदेंत केलेली मीं ऐकली आहे. कोळसा, पोलाद, सीमेंट यांचें वांटप सरकारने विशिष्ट कार्याकरिता म्हणून केलें तरी त्यांचा उपयोग कशाकरितां होईल हें तात्कालिक परिस्थितीवर अवलंबून राहणार. आणि सरकारने प्रत्यक्ष विलोभनें दाखविलीं तरी त्यांचा उपयोगहि एकंदर बाजारभावावर अवलंबून, कोणत्याहि विलोभनाचें सामर्थ्य तौलनिक दृष्टयां मापावें लागतें. सरकारला इष्ट वाटत असलेल्या उत्पादन अगर इतर व्यवहारापेक्षा दुसरा व्यवहार बाजारभावांनी जास्त किफायतशीर ठरविला तर ही परिस्थिती कायम राहीपावेतों सरकारने देऊं केलेली मदत फोल ठरेल.

आपल्या देशांतील अलीकडील परिस्थिती अपवादात्मक मानली, तरी अप्रत्यक्ष नियंत्रण व अल्प मदत याचे आधारावर सरकारी योजना कितपत यशस्वी होऊं शकते याचा इतर देशांतील अनुभव ग्राह्य मानला पाहिजे. १९३१ सालानंतरच्या मंदीच्या दिवसांत इंग्लंड व स्कॉटलंडमधील कांहीं उद्योगधंद्यांस विशेष हलाखीचे दिवस आले व हे धंदे जेथे केंद्रित होते त्या भागांतील एकंदर आर्थिक स्थिति फार खालावली. अशा निकृष्ट भागांस ऊर्जितावस्थेस आणण्याकरिता सरकारने कांही योजना आंखल्या व या अमलांत आणल्या जाव्या म्हणून कांही अप्रत्यक्ष नियंत्रणें व अल्पशी प्रत्यक्ष मदत यांचा अवलंब केला. त्या वेळचें ब्रिटिश सरकार हुजूर पक्षीय असल्यामुळे याहून प्रभावी आर्थिक धोरणाचें त्यास वावडें होतें. एकदोन ठिकाणीं या योजना अंशतः यशस्वी झाल्या; पण इतरत्र त्यांचा उपयोग झाला नाही. योजनाप्रसिद्धीनंतरच्या काळांत जेवढ्या बाबी खाजगी व्यक्ति अगर मंडळ्या यांस किफायतशीर वाटल्या तेवढ्या घडून आल्या; इतर तशाच राहिल्या.

## आर्थिक विकास कसा घडून येईल ?

एवंच, सरकारी योजनेनुसार आर्थिक विकास घडवून आणावयाचा तर फार मोठें आर्थिक क्षेत्र सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यांतलें तरी हवें किंवा सरकारच्या कडक नियंत्रणाखालील हवें. प्रमुख उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे करावयाचे नाहीत अशी घोषणा झाल्यामुळे हिंदुस्थान सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यांत मोठें आर्थिक

क्षेत्र येण्याचा संभव दुरावला आहे. आपलें कोणतेंहि धोरण नियंत्रणाच्या साहाय्यानें खाजगी व्यक्तींकडून घडवून आणण्याची इच्छा अगर शक्ति आजच्या हिंदुस्थान सरकारास नाही हेंहि उघड आहे. विनियंत्रणाचें एकंदर धोरण स्वीकारलें असल्यामुळे भोग्य वस्तूंचें उत्पादन, वांटप व किंमती यांचें नियंत्रणहि सरकार करणार नाही. याचा अर्थ मुख्यतः कांही कारखानदार व व्यापारी यांच्या उत्पादनावर व किफायतीवर प्रत्यक्ष नियंत्रण सरकार ठेवणार नाही. इतर नियंत्रणांच्या बाबत हिंदी धनिकांचा पक्ष अतिरेकी नाही. आपण उत्पादन करीत असलेल्या वस्तूंच्या किंमतीवर अगर वांटपावर सरकारनें नियंत्रण ठेवूं नये असा त्यांचा आग्रह आहे; परंतु उत्पादनास लागणाऱ्या यंत्रसाहित्यापासून सर्व गोष्टी मिळवून देणें, मालाची वाहतुक सुकर व स्वस्त करणें आणि स्वदेशीची बाजारपेठ, आवश्यक तर गिऱ्हाइकावर जादा बोजे लादूनहि, आपणांकरिता सुरक्षित ठेवणें हीं सर्व सरकारी विहित कर्तव्यें ते समजतात. म्हणून आर्थिक विकासाच्या योजना सरकारनें कांही आंखल्या तर सरकारी मदतीनें व स्वतःच्या मालकी हक्कानें त्या पार पाडण्याची यांनी तयारी दर्शविली आहे. आजहि सर्व भोग्य, विशेषतः जीवनावश्यक, वस्तूंखेरीज इतर भाव व वांटप यांचें नियंत्रण त्यांस हवें आहे. मध्यंतरीं खुले आयात परवाने सरकारनें दिल्यामुळे बाजारांत किती गडबड उडाली व सरकारवर अनेक व्यापारी कसे रुष्ट झाले हें सर्वांच्या स्मरणांत असेलच.

यावर असें म्हणतां येईल कीं व्यक्तिसाहसावर आर्थिक प्रगति सोंपविल्यावर ती सरकारी योजनेप्रमाणेंच घडून न आली तर काय बिघडलें? एकंदर राष्ट्राची संपत्ति व उत्पादन वाढूं लागलें म्हणजे आर्थिक प्रगति विशिष्ट दिशेनें विशिष्ट प्रमाणांत झाली अगर न झाली तर विषाद मानण्याचें कारण नाही. ज्ञानी माणसासहि भविष्याचा अचूक अंदाज करितां येत नाही म्हणून योजनेविना यदृच्छया घडून आलेली प्रगतीच खरी हितावह व शाश्वत ठरते. हा पक्ष नवीन नाही; यूरोपीय अर्थशास्त्रज्ञांचा हा सनातन वाद आहे व व्यक्तिसाहसवाद्यांस तो अर्थातच पूर्णपणें मान्य नाही. हिंदी भांडवलवाले, फक्त परराष्ट्रीय स्पर्धा खुली ठेवूं नये एवढी मुरड घालून, याच मताचा पुरस्कार करीत असत. हिंदी राजकीय पुढाऱ्यांच्या आजवरच्या घोषणा भिन्न धोरणाच्या होत्या; पण राज्ययंत्राची जबाबदारी अंगावर पडल्यावर त्यांस आपलीं मतें बदलावीं लागलीं असावीं.

प्रत्यक्ष या वादाबद्दल असें मला कांहींच म्हणावयाचें नाही. पण व्यक्तिसाहसावर आर्थिक प्रगतीची मदार ठेवली तर त्याच्या पाठोपाठ इतर कोणत्या गोष्टी येतात या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणें शक्य नाही. या प्रश्नाचें उत्तर देण्यास मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या कारयोजनेतील नवीन उपक्रमांनीं सूचक सुरुवात केली आहे असें म्हणण्यास हरकत नाही. आर्थिक विकासाचा आरंभ भांडवल गुंतविण्यापासून होतो. व्यक्तिसाहसानें आर्थिक प्रगति घडून येण्यास साहसी व्यक्तींस शिलकी भांडवल व तें किफाय-

तशीर रीतीने गुंतविण्याचे मार्ग हीं दोन्ही उपलब्ध हवींत. यांचे अभावीं सर्व प्रगति खचित खुंटणार. सरकारी करांच्या बोजाखाली आमचा धनिकवर्ग इतका दडपला गेला आहे कीं अलीकडे त्याजजवळ गुंतवावयास उर्वरित पैसा नाही; व सरकारी नियंत्रणें आणि घोषणा, निर्बंध व कर यांचेमुळे उद्योगधंदे इतके खालावले व खचले आहेत कीं असलेला थोडाबहुत पैसा कोणत्याहि दीर्घकालीन योजनांत घालण्यास त्यांजला उत्साह उरलेला नाही. अशी बिकट परिस्थिती असल्याचें करुण निवेदन सर्व उद्योगपति आज दीड–दोन वर्षे वेळीं अवेळीं करीत आहेत. राजकारणपटूंस यांत तथ्यांश आहे असें पटलें असावें म्हणून ते, आम्ही तुमच्या भांडवलास निदान दहा वर्षे तरी हात लावणार नाही असें वारखें कळकळीचें आश्वासन देत असतात. पण केवळ आश्वासनांनी भांडवलवाल्यांचें समाधान होईना. तेव्हां आतां भांडवलवाल्यांस पटण्यासारखी कांही प्रत्यक्ष कृति करण्यास ते उद्युक्त झाले असावे. ही कृति म्हणजे श्रीमंतांवरील व उद्योगमंडळ्यांवरील प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करणें व नवीन उद्योगधंदे काढण्यास व चालविण्यास खास सवलती देणें.

व्यक्तिगत व उद्योगमंडळें यांवरील करांचा प्रश्न विशेष बिकट होण्यास लियाकत अलीखानांचें अंदाजपत्रक कारणीभूत झालें; व आजच्या बऱ्याचशा घोटाळ्यांच्या बुडाशीं हेंच अंदाजपत्रक आहे. हिंदी धनिकवर्ग मूठभर लोकांचा आहे, त्याचे हातीं अवास्तव पैसा व अधिकार साचला आहे, असें सांगून या वर्गाची आर्थिक सत्ता कमी करण्याच्या स्पष्ट व उघड इराद्यानुसार या अंदाजपत्रकाची रचना झाली. या अंदाजपत्रकास इतर कोणीहि विरोध केला असला तरी आजचे हिंदुस्थानचे मुख्य प्रधान व अर्थमंत्री या दोहोंचाहि त्यास पाठिंबा होता अशी दिल्लीस त्या वेळेस वदंता होती. या अंदाजपत्रकाचे दूरगामी परिणाम होणार हें त्या वेळेसहि कळण्यासारखें होतें. धनिकांवर व मोठ्या धंद्यांवर अधिकाधिक कर लादले म्हणजे आजचे धंदे हळूहळू सरकारी मालकीचे करणें व आर्थिक विकासाच्या नवीन योजना बहुतांशी सरकारमार्फत करणें हें ओघाने घडणारच. मार्च १९४७ मध्यें कॉंग्रेस पक्षाच्या कार्यक्रमांत उद्योगधंद्यांच्या सत्वर राष्ट्रीयीकरणाचा समावेश असल्याने लियाकत अलींचें अंदाजपत्रक व कॉंग्रेस पक्षाचा आर्थिक कार्यक्रम यांचा तत्वतः विरोध आहे असें मानण्याचें कारण नव्हतें. पण आतां कार्यक्रम बदलल्यामुळे त्या अंदाजपत्रकानुसार केल्या गेलेल्या गोष्टींची अडचण भासूं लागली आहे. खासगी व्यक्तींकरवीं उद्योगधंदे वाढीस लावावयाचे तर त्यांस तसें करण्यास कांही वाव व विलोभन दिलें पाहिजे. हल्लींच्या करपद्धतीमुळे तसा वाव कर चुकविल्याखेरीज मिळत नाही; आणि कर चुकवूनहि सांचलेला पैसा उघडपणें उद्योगधंद्यांत गुंतविण्यास तांत्रिक अडचणी अनेक येतात. ही कोंडी फोडण्याचा एक उपाय म्हणजे धनिकांवर व मोठ्या धंद्यांवर असलेला प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करणें;

करियोजनेतील नवीन दृष्टी ही एकंदर नवीन धोरणांतच कशी अंगभूत आहे हें आतां कळून येईल.

विनियंत्रण, राष्ट्रीयीकरण न करण्याची घोषणा व धनिकांवरील कर कमी करणें या सर्व गोष्टी एका सूत्रांत गोंवलेल्या आहेत. हें सूत्र म्हणजे हेतुपूर्वक आर्थिक नियोजन करण्याकरिता अर्थव्यवहाराचें मोठें क्षेत्र सरकारी मालकी अगर नियंत्रण या खालीं न आणतां, भविष्यांतील भिस्त बहुतांशीं खाजगी व्यवहारावर टाकावयाची. हें सूत्र व त्याचे पुढील धागेदोरे यांची आज सर्वांस नीटशी कल्पना आहे असें म्हणवत नाही. परंतु हें नवीन धोरण फारसें लोकप्रिय दिसत नाही; त्यांतल्या त्यांत करपद्धतीवरील त्याचे परिणाम हे अनिष्ट आहेत अशी सुप्त भावना जिकडे तिकडे दिसते. विनियंत्रणास सर्व थरांतील व्यक्तींचा पाठिंबा मिळूं शकतो, व धंद्याचें राष्ट्रीयीकरण केलें पाहिजे या मताचा आपल्या देशांत अजून फारसा प्रचार झालेला नाही. पण सरकारी आर्थिक धोरणाचा परिणाम श्रीमंतांवरील प्रत्यक्ष कर कमी करून गरीबांच्यावर पडणाऱ्या अप्रत्यक्ष करांच्या वाढींत झाला म्हणजे मात्र कांहीतरी खचित चुकतें असें बहुजनांस वाटूं लागतें. असो! आपणांस विचार करावयाचा तो तात्कालिक लोकमताचा नव्हे तर शाश्वत राष्ट्रहिताचा. याकरिता हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाचा एका निराळ्या भूमिकेवरून विचार केला पाहिजे. ही भूमिका म्हणजे गरीब राष्ट्रास अनुरूप असणाऱ्या आर्थिक धोरणाची.

## आर्थिक विकासयोजनेच्या मार्गांतील अडचणी

जसें व्यक्तीस तसें राष्ट्रांसहि दारिद्र्य पदोपदीं नाडतें. गरीबी जितकी अधिक, तितक्या अतृप्त आकांक्षा अधिक; पण त्या पुऱ्या करण्याचें सामर्थ्य व्यस्त प्रमाणांत. गरीब देशाच्या आर्थिक विकास-योजनेच्या मार्गांतील मुख्य अडचणी खालीप्रमाणें आहेत. देश गरीब याचा अर्थ लोकसंख्येच्या मानानें वार्षिक उत्पादन कमी, आणि सार्वजनिक राहणीचें मान निकृष्ट; त्यांतल्या त्यांत मजूर, शेतकरी इ. वर्गांची राहणी फार हलाखीची. असें असल्यामुळे राहणीचें मान वाढविणें हें आर्थिक योजनेचें एक प्रमुख उद्दिष्ट साहजिकच ठरतें. गरीबांच्या राहणीचें मान दोन प्रकारें वाढवितां येतें. एक राष्ट्रीय उत्पादन वाढवून व दुसरें सार्वदेशीय उत्पन्नाची वर्गावर्गांतील वांटणी जास्त सम करून. पहिला मार्ग शाश्वत व दूरदृष्ट्या खरा महत्त्वाचा. परंतु त्याचे परिणाम दिसूं लागण्यास बराच कालावधि लागण्याचा संभव असतो. याकरिता दुसऱ्या मार्गाचा अवलंब करणें आवश्यक असतें. हा मार्ग अवलंबण्याचे दोन मुख्य प्रकार; एक किंमतीचें योग्य नियंत्रण करून शेतकरी व मजूर यांस राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग पूर्वीपेक्षा अधिक मिळवून देण्याचा प्रयत्न करणें व दुसरा गरीबांच्या आर्थिक अडचणी अंशतः भागविण्याकरिता, आजार, बेकार, वृद्धावस्था इत्यादि प्रसंगीं सरकारी खर्चानें सार्वजनिक मदतीची तरतूद करणें.

आर्थिक विकासयोजनेचें अंतिम उद्दिष्ट देश संपन्न व बलवान करणें असल्यामुळे त्यांत राष्ट्रीय उत्पादन वाढविणें व गरीबांच्या राहणीचें मान वाढविणें यांचा सारखाच समावेश होतो. पण ही गोष्ट अंतिम ध्येयाची झाली; आर्थिक विकासयोजनेच्या सुरवातीपासूनच गरीबांच्या राहणीचें मान वाढतें अगर वाढूं शकतें असें नाही. किंबहुना एका अर्थी आर्थिक विकासयोजनेची शीघ्र प्रगति व गरीबांच्या राहणीचें मान तावडतोब वाढविणें या गोष्टी गरीब देशांत परस्परविरोधी भासतात. देश गरीब असण्याचीं कारणें सगळीकडे सारखीच नसतात. निसर्गसंपत्ति थोडी, लोकसंख्या फार, भांडवली साधनें कमी, आधुनिक तज्ज्ञ कामगारांचा अभाव यांपैकी एक किंवा अनेक कारणांमुळे देश गरीब असतात वा राहतात. पण बहुतेक सर्व गरीब देशांत भांडवली साधनें व तज्ज्ञपणा यांचा अभाव विशेष भासतो. अलीकडील शास्त्रीय प्रगतीमुळे जवळजवळ सर्वत्र भांडवल गुंतविण्यामुळे, म्हणजे मुख्यत्वेंकरून आधुनिक यांत्रिक साधनें उपयोगांत आणूं लागल्यानें, उत्पादन झपाट्यानें वाढूं शकतें.

पण भांडवल गुंतविण्याकरिता तें उपलब्ध झालें पाहिजे. नवीन भांडवल तीन मार्गांनी उपलब्ध होऊं शकतें. लूट, कर्ज व बचत. पहिला मार्ग संमत मानला तरी दुबळ्या देशाचे दृष्टीने व्यवहार्य नाही. तेव्हा आर्थिक विकासयोजनेचा पाया कर्जाऊ भांडवल मिळवून किंवा राष्ट्रांतील बचत वाढवून उभारावा लागतो. अलीकडील कोणत्याच योजनेंत यापैकीं केवळ एकाच मार्गाचा अवलंब केलेला आढळत नाही. प्रगति लवकर घडविण्याकरिता सर्वच देश कर्जाऊ भांडवल मिळविण्याचा प्रयत्न करतात. पण आज जगांत धनको अत्यल्प व ऋणको बहुसंख्य असल्यामुळे भांडवल परदेशांतून सहज किंवा पुष्कळ मिळण्याचा संभव कमी. तेव्हां आर्थिक विकास योजनेकरिता स्वदेशींहि भांडवल बरेंच उभारावें लागतें. राष्ट्रीय बचत करणें किंवा भांडवल उभारणें याचा खरा अर्थ बऱ्याच जणांस माहित नसतो. आर्थिक प्रगतीसाठी भांडवली खर्च करणें म्हणजे चालू उत्पादनापैकी बराच भाग भोग्य वस्तूंचे ऐवजीं उत्पादक भांडवली वस्तूंच्या निर्मितीसाठीं योजणें हा आहे. गरीबी नडते ती मुख्यत्वें येथें. बहुजनसमाजास आवश्यक अशा अन्न, वस्त्रादि वस्तूंचा किमान पुरवठा असल्याशिवाय जनतेच्या राहणीचें मान किमान दर्जाचें ठेवतां येत नाही. परंतु गरीब देशानें मोठ्या प्रमाणावर बचत करावयाची तर एवढा किमान पुरवठाहि करणें दुरापस्त होतें. अमेरिकेसारख्या संपन्न देशांत मोठ्या युद्धाचा खर्च चालविला तरी थोड्या गैरसोयी व कांही चैनींचा त्याग, याहून अधिक परिणाम एकंदर जनतेवर झाला नाही. इंग्लंडमध्यें युद्धकालीं व युद्धोत्तरकालीं श्रीमंत व मध्यम वर्गांस आपल्या राहणीच्या दृष्टीने फार मोठा त्याग करावा लागला, पण बहुजन-समाजाची राहणी युद्धकाळांतहि फारशी खालावली नाही. आपल्याकडे श्रीमंत व मध्यम वर्गांची राहणी उतरवूनहि भागेलच असें नाही. आपणांवर गरीब वर्ग धरून

सर्वांचेंच पोट बांधण्याची पाळी आहे. पण ज्याचें पोट आधींच खपाटीस गेलेले त्याचें आणखी पोट बांधणार तरी किती. राहणीचें मान वाढविणें व भांडवली बचत करणें यांमधील सुरवातीचा विरोध हा असा बिकट आहे.

गरीब देशांच्या आर्थिक विकास योजनेंतील दुसरी अडचण योजना कोणातर्फे व कशी घडवून आणावयाची याबाबतची आहे. यांतील पर्याय स्थूलमानाने दोनच. विकासयोजना सरकारी मानणें किंवा ती खाजगी व्यक्ति व मंडळयांवर सोपविणें. योजना सरकारमार्फत घडवून आणण्याचे फायदे उघड आहेत. योजनेंतील सर्व परस्परावलंबी अंगें यामुळे नियंत्रित व प्रमाणबद्ध राहूं शकतात. विशेषतः राष्ट्रास पोट बांधण्याचा प्रसंग आला तर त्याचे परिणाम विशिष्ट वर्गांवरच घडून न येता सर्वांस सारखे भासतील व असंतोष आणि वैषम्याची भावना न वाढेल अशी सरकारास खबरदारी घेतां येते व घ्यावी लागते. आर्थिक विकास इष्ट दिशेने होईल व भोग्य वस्तू आणि उत्पादक वस्तू यांच्या उत्पादनांत नियोजित प्रमाणांत वाढ होईल अशी सरकारला काळजी घेतां येते इतकेंच नव्हे, तर भोग्य वस्तूंचें उत्पादन वाढवावयाचें तें चैनीच्या वस्तूंचें न वाढवितां प्राथमिक गरजा भागवितील अशांचें वाढवावें, व तसें वाढल्यावर त्यांचें वाटप सार्वजनिक व्हावें अशीहि योजना करितां येते. शेवटी सरकारमार्फत आर्थिक विकासयोजना घडवून आणण्याचा सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे आर्थिक प्रगतीमुळे वाढणारें राष्ट्रीय उत्पन्न हें मुख्यतः सरकारच्या हातांत राहून या वाढत्या श्रीमंतीचा, बचतीच्या वाढत्या कुवतीचा फायदा सरकारलाच म्हणजे पर्यायाने सर्व जनतेसच मिळतो. याचे उलट आर्थिक विकासयोजना सरकारमार्फत घडवून आणण्याइतकें सरकार कार्यक्षम नाही; सरकारी सेवक सचोटीचे नाहींत व जनता सहकारी नाही; म्हणून तो सरकारने हातीं घेणें धोक्याचें आहे असें सांगण्यांत येतें.

व्यक्तिसाहसावरील अवलंबित आर्थिक विकासाचा मार्ग अगदीं भिन्न दिशेनें जातो. सरकारच्या हातीं सर्व कारभार असला म्हणजे भांडवली बचत करणें व आवश्यक वस्तूंचें उत्पादन व वांटप हीं एकाच योजनेचीं दोन अंगें असतात. खाजगी व्यवहारांत तसें नसतें. व्यक्तिसाहसाने प्रगति घडवून आणण्याकरिता साहसी व्यक्तींच्या हातांत धनसंचय झाला पाहिजे, किंवा धनिकांनी तो त्यांचे हातीं दिला पाहिजे. जितका हा धनसंचय अधिक तितकें भांडवल गुंतवलें जाण्याचा संभव जास्त; व जितका साहसी व्यक्तींचा नफा अधिक तितके संचय वाढण्याची व त्याअर्थी उद्योग धडाडीने करण्याची शक्यता जास्त. खाजगी व्यक्ति अगर मंडळ्या यांचेमार्फत उद्योगधंद्याची वाढ, त्यांचे हातांत भांडवल बरेंच सांठलें व त्यांस बरीच किफायत झाली म्हणजेच होणार. श्रीमंत देशांत वार्षिक ऐन बचत करण्याची ऐपत बहुसंख्य वर्गांची असूं शकते आणि उद्योगधंद्यांचे वाढीस लागणारा भांडवलाचा

पुरवठा खाजगी व्यक्तीमार्फत होण्यास संपत्तीची फार विषम वांटणी असावीच लागते असें नाही. गरीब देशांत बहुसंख्य भिकार व मूठभर लोक फार मातबर असल्याखेरीज व्यक्तिसाहसावर आधारलेली अर्थव्यवस्था चालणें शक्य नाही. संपत्तीच्या पुरवठ्याबाबत नव्हे तर धान्य पुरवठ्याबाबतहि हाच नियम लागू पडतो. पिढ्यानपिढ्या निकृष्टावस्थेंत असलेल्या शेतकऱ्यानें थोडें डोकें वर काढल्याबरोबर निर्यातीस पूर्वी उपलब्ध असलेलें धान्य खावटींत जिरतें असा अनेक देशांचा अनुभव आहे.

गरीब देशांत भांडवल सांठविण्याचे दोनच मार्ग. सर्वांस जवळजवळ सारख्या राहणीच्या मानावर आणून सक्तीने सार्वदेशीय बचत करणें व दुसरा बहुजनसमाजास विशेष निकृष्टावस्थेंत ठेवून मूठभर लोकांचे हातांतील धनसंचय व सत्ता सारखी वाढतील अशी तरतूद करणें. पहिला मार्ग रशियाने चोखाळला आहे; दुसरा हिंदुस्थान चोखाळूं पाहात आहे. दुसऱ्या मार्गांत संपत्तीची व उत्पन्नाची विषम वांटणी सुरवातीस असावी लागतेच; एवढेंच नव्हे तर ही विषमता सारखी वाढत जाणें या विशिष्ट परिस्थितींत अपरिहार्य आहे. ज्यांचे हातीं मुख्य उद्योग व्यापार त्यांचेच कडे उत्पन्नाचा मोठा ओघ सारखा वाहणार; शिवाय बचत करण्याची खरी कुवत या मूठभर लोकांचे हातींच असणार. गरीब व मागासलेल्या देशांत सावकारी, व्यापार व कारखानदारी यांपासून मिळणारी आवकहि तौलनिक दृष्ट्या मोठी असते. तेव्हा मूळचा संचय मोठा व उत्पन्न मोठें आणि बचत करण्याची ऐपत व विशेष किफायतीचीं बहुतेक साधनें हीं दोन्हीं याच लहान वर्गाच्या हातीं केंद्रित; एवढें सगळें झाल्यावर आर्थिक विषमता सारखी वाढणें अपरिहार्य आहे. हिंदुस्थानांत, विशेषतः गेल्या २५–३० वर्षांत ही गोष्ट प्रत्यक्ष घडून आली आहे असें म्हणण्यास हरकत नाही.

## वाढत्या आर्थिक विषमतेला आळा कसा घालतां येईल ?

या वाढत्या आर्थिक विषमतेला आळा दोन प्रकारें घालतां येईल. एक तर औद्योगिक मालाच्या किंमतींचें कडक नियंत्रण करून त्यांत अल्प फायदा राहील अशी मुळांतच व्यवस्था करणें किंवा धनिक लोकांच्या अवास्तव उत्पन्नांवर जबर कर लादून समाजस्वास्थ्य वाढविण्याच्या योजनांकडे करांचें उत्पन्न वापरणें. यांतील एकहि धोरण हिंदुस्थानसरकार स्वीकारण्यास तयार नाहीं हें आपण पाहिलेंच आहे. आणि आर्थिक विकासाच्या योजना या व्यक्तिसाहसाधिष्ठित ठेवावयाच्या म्हटल्यास हिंदुस्थानसरकारचें अलीकडील धोरण चुकलें नाही असेंच कबूल करावें लागेल. औद्योगिक मालाच्या किंमतींचें कडक नियंत्रण केल्यास नवीन उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्यास व जुनें उत्पादन वाढविण्यास उत्तेजक परिस्थिति उरत नाही. व जबर करांनी श्रीमंतां-जवळचें द्रव्य शोषण केल्यास खाजगी धंदे चालविणाऱ्यांजवळ नवीन भांडवल पुरेसें

-सांचूं शकत नाही. श्रीमंतांवरील प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करण्याच्या नवीन प्रवृत्तीचा उगमहि सरकारच्या मूळ आर्थिक धोरणापासून झाला आहे. जबर कर लादला असतां वा कायद्यांचें कडक नियंत्रण केलें असतां भांडवलवाले नवीन धंदे काढण्यास कचरले तर त्यांना दोष देण्यांत अर्थ नाहीं. अनियंत्रित खाजगी व्यवहार हा असाच चालावयाचा. "संप" करणारे भांडवलवाले स्वधर्मानें चालत आहेत; मात्र खासगी व्यवहाराधिष्ठित अर्थव्यवस्था व आर्थिक समता यांची सांगड घालूं पाहणारे किंवा घालतो म्हणणारे हे स्वतःची व जनतेची फसवणूक करीत आहेत.

मूठभर लोकांचे हातांत धनसंचय फाजिल होईल अशी व्यवस्था करणें ही खाजगी व्यक्ति व मंडळ्यांमार्फत आर्थिक प्रगति घडवून आणावयाच्या धोरणाची एक बाजू झाली. याचीच दुसरी बाजू म्हणजे समाजांतील इतर वर्गांचें उत्पन्न अगर त्यांची क्रयशक्ति फाजिल न वाढेल याची काळजी घेणें. ज्या वर्गाकरवीं उद्योगधंद्यांची वाढ घडवावयाची त्यांच्या उत्पन्नावर ( व पर्यायानें राहणीवर ) नियंत्रण घालणें हें सयुक्तिक नाही. याचे उलट या वर्गांच्या हातीं धनसंचय होण्याकरितां इतरांचें उत्पन्न मर्यादित करणें हेंच आवश्यक; कारण एकंदर राष्ट्रीय उत्पन्न मर्यादित व तोकडें असल्यानें एकाचा संचय, दुसरीकडे तोकडेपणा आला तरच वाढूं शकतो. प्रत्यक्ष करांचा बोजा उतरवूं पाहत असतां अप्रत्यक्ष करांचा बोजा सारखा वाढत आहे याचें मर्म वरील आवश्यकतेंत आहे; व जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपाचें विनियंत्रण करणें याकरितांच श्रेयस्कर ठरतें. सर्वसाधारणपणें जीवनावश्यक वस्तू नियंत्रित दरांत वांटप केल्याने गरीबांच्या राहणीचें मान स्थिरावतें असा अनुभव आहे. पण असें केल्यानें राष्ट्रीय उत्पादनाचा बराच भाग गरीबांस लागणाऱ्या भोग्य वस्तूंत जातो. विनियंत्रण केलें म्हणजे वांटपाची सरकारी जबाबदारी टाळतां येते आणि मग गरीबांच्या राहणीचें मान खालावलें किंवा नाही याकडे लक्ष देण्याचें कारण उरत नाही; किंबहुना खरें बोलावयाचें म्हणजे, गरीबांच्या राहणीचें फाजिल वाढलेलें मान उतरविण्याकरितां विनियंत्रण करावयाचें असतें. खाजगी व्यवहाराखाली सर्व वस्तूंचें वांटप व्यक्तींच्या व वर्गांच्या ऐपतीप्रमाणें होतें. ज्याला जें परवडत नाही तें त्याला मिळत नाही. नियंत्रित वांटपांतहि वस्तूंच्या किंमती अवास्तव ठेवल्या तर हल्लीं कापड-नियंत्रणाची झाली तशी अवस्था होऊं शकते. पण अशा परिस्थितींत किंमती अवास्तव ठेवल्याबद्दल सरकार दोषी ठरण्याचा संभव असतो. विनियंत्रण केलें असतां कोणतीच अडचण भासत नाही. विनियंत्रण करून किंमती वाढूं दिल्या कीं बहुजनांच्या राहणीचें मान साहजिकच उतरतें व बहुजनांची पैशाची आवक वाढली असल्यास अप्रत्यक्ष करांमार्फत तिचें शोषण होतें. यांतील कांही अप्रत्यक्ष कर व्यापारी–कारखानदार यांचे हितार्थ लादले असल्यास तिकडूनहि आवश्यक आर्थिक विषमता निर्माण करण्यास मदत होते.

## मजूर-वर्ग-विषयक सरकारी धोरणाचे विशेष

अप्रत्यक्ष कराची वाढ, इतर वर्गाचे उत्पन्न कमी राखण्याचा एक मार्ग आहे. इतर दृष्टीनेहि सरकारी आर्थिक धोरण या परिस्थितींत कसें असावें लागतें हें पाहिलें पाहिजे. आज सकृत्‌दर्शनीं तरी औद्योगिक मजूर वर्गाचें उत्पन्न व सुखसोई वाढविण्याचा विशेष प्रयत्न सरकार करीत आहे असें वाटतें. मजूर-वर्गाबाबत हिंदुस्थान सरकारनें स्वीकारलेल्या धोरणाचे विशेष पुढीलप्रमाणें सांगतां येतील:—संप टाळून मजुरीचे दर व इतर विवाद्य प्रश्न लवादामार्फत मिटविणें व मजुरांकरितां राहण्याच्या व इतर सोयींकरता पैसा खर्च करणें. मजुरीचे दर योग्य वा चढीचे असतील किंवा नाहीं हें लवाद निवाडे कोणत्या दृष्टीने दिले जातात यावर अवलंबून आहे. गेल्या कांही वर्षांतील तेजीच्या काळांत लवाद निवाडे बरेच मजुरांच्या बाजूचे असे वाटले; किंवा ते असे होते अशी तक्रार कारखानदार करीत आले. परंतु मंदीची झळ भासूं लागल्यावर लवादपद्धतीचा उपयोग मजुरीचे दर टिकविण्यास कितपत होईल हें सांगणें कठीण आहे. खाजगी व्यवहारांत तोटा येऊं लागला म्हणून कारखाना बंद करण्याची धमकी देणें हें शेवटचें अस्त्र मालकांच्या हातीं असतें. तेव्हां तोटा भरून देण्याची अगर कारखाना स्वतःच्या हातीं घेण्याची सरकारची तयारी असल्याखेरीज मजुरीचे दर टिकविण्याकरितां सरकारला कांही करतां येत नाही.

लवादामार्फत मजुरीचे दर ठरविण्याऐवजी मजुरीच्या योग्य दरांची कायमची शास्त्रीय बांधणी करणें व कारखानदारांच्या किफायतींत मजुरांस ठराविक प्रमाणांत भागी देणें याहि, मजूर वर्गास संतुष्ट ठेवण्याच्या उपायांचा बराच उहापोह अलीकडे होत असतो. मजुरीच्या दरांची शास्त्रीय बांधणीची कल्पना मुळातच अशास्त्रीय आहे आणि कारखानदारांच्या फायद्यांतील पाती दिल्यानें मजुरांचा संतोष वाढतो असाहि आजवरचा अनुभव नाहीं. परंतु या दोन्ही उपायांबाबतची खरी अडचण निराळीच आहे. शास्त्रीय म्हणून मजुरांचे दर ठरविण्याची विवक्षित पद्धति ठरविली, तरी तिची अंमलबजावणी करण्यांत अनेक अडथळे येतात; या सर्वांतून मार्ग काढावयाचा तर सरकारला प्रत्येक धंद्याचे आणि प्रत्येक कारखान्याचे सर्व व्यवहार व हिशेब अत्यंत बारकाईने तपासावे लागतील. परंतु हें करावयास सरकार असमर्थ आहे. उत्पादनाच्या किंमती ठरवितांनासुद्धा कारखानदारांकडून पुरेशी तपशीलवार माहिती ज्या सरकारला उपलब्ध होऊं शकत नाही, तें सरकार मजुरीच्या बांधीव दरांची अगर फायद्यांच्या वांटणीची योजना कसोशीनें अंमलांत आणूं शकेल हें संभवत नाही. त्या गोष्टी साधण्याची शक्ति ज्या सरकारला असेल तें राष्ट्रीयीकरणास भ्यावयाचें नाही.

औद्योगिक मजूर वर्गास संतुष्ट राखण्याचा हर प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे; व तेजीचे दिवस आहेत तोंवर त्यांत यश मिळण्यासहि हरकत नाही.

मजूरविषयक धोरणाची खरी परीक्षा मंदीच्या काळांत होत असते. मंदीच्या काळांत खऱ्या आवश्यक असलेल्या बेकारी, आजार व वृद्धावस्था वेतनाच्या कोणत्याच योजना सरकारने अजून हातीं घेतलेल्या नाहींत. मजूरींचे दर आज वाढलेले दिसले तरी विनियंत्रणाच्या धोरणामुळे राहणीचें मानहि बेसुमार वाढलें आहे व सरासरीने, आजच्या राहणीच्या मानांतील वाढ मजूरींच्या दरांपेक्षा अधिक आहे. काम सर्वांस भरपूर आहे तोंपावेतों राहणीच्या मानांतील वाढ तितकी जाचक नसते. परंतु एकदां मंदी आली कीं सर्व परिस्थिति बदलेल. मजुरीच्या दरांची घसरगुंडी व बेकारीची वाढ यांस आळा घालण्यास सरकारजवळ कोणतेंच साधन उपलब्ध नाही. आणि मंदी आली कीं, घरें आणि मजुरांच्या इतर सुखसोयींकरिता जो पैसा सरकार आज खर्च करीत आहे तोहि पुरवितां येणार नाही. अर्थात्, एकंदर औद्योगिक मजूरवर्गाची संख्या हिंदुस्थानांत कमी आहे, व सरकारने मनांत आणलेंच तर विशेष पैसा खर्च करून त्यांची अल्प सोय मंदीतहि करतां येईल. पण याचा अर्थ एवढाच होईल कीं कारखानदार, सरकार व औद्योगिक मजूर यांच्या संगनमताने इतर वर्गांवर फार बोजा पडेल. ही केवळ कल्पना नाही. टाटा कंपनीने दोन वर्षांपूर्वी पोलादाचे भाव वाढवून मिळण्याकरिता सरकारडे अर्ज केला. अर्ज करतांना प्रचलित भावांमुळे तोटा सोसावा लागत आहे असें प्रत्यक्ष कंपनीसहि म्हणतां येत नव्हतें. परंतु आपणांस दर वर्षीं तीन महिन्यांच्या वेतनाइतका फायद्यांतील भाग म्हणून बोनस मिळेल अशी टाटा कामगारांची अपेक्षा पक्की बांधली गेली आहे; याबाबत त्यांची निराशा झाल्यास कारखाना बंदहि पडेल; त्याअर्थी, ज्यायोगें कामगारांस तीन महिने वेतनाइतका भाग म्हणून वांटतां येईल एवढें फायद्याचें प्रमाण कंपनीस पडलेंच पाहिजे व तें पडेल असें भाव सरकारनें बांधून दिले पाहिजेत असा युक्तिवाद करण्यांत आला; आणि भावनियंत्रण मंडळाने या युक्तिवादास विरोधी असा स्पष्ट अभिप्राय नमूद केला असताहि त्या मंडळाच्या विसर्जनानंतर कंपनीनें किंमतींत मागितली होती त्याहूनहि अधिक वाढ सरकारनें मान्य केली!

## शेतीविषयक धोरण

औद्योगिक मजूरांच्या संख्येपेक्षा कितीतरी पटीनें मोठी संख्या शेतकरी वर्गाची आहे. या वर्गाचें उत्पन्न शेती मालाच्या किंमतींच्या प्रमाणावर अवलंबून असतें. कृषि-उत्पादन व यंत्रोत्पादन यांच्या किंमतींचें परस्पर प्रमाण हें शेती उत्पन्नाच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचें समजलें पाहिजे. यांत्रिक युगाच्या सुरवातीपासूनचा सर्वसाधारण अनुभव असा कीं कच्चा माल व पक्का माल यांच्या देवघेवींत पक्क्या मालाच्या उत्पादकाची किफायत बहुधा जास्त राहते. कच्च्या मालाचे उत्पादक गरीब, बहुसंख्य, असंघटित असतात; त्यांना बाजारभावाची

अटकळ कमी, ओढून धरण्याची कुवत असणे व आपल्या उत्पादनयोजनेंत फेरबदल करून उत्पादन लवकर वाढविणें अगर घटविणें दुरापास्त असतें. यामुळें तेजीच्या कांहीं वर्षांत त्यांची जरी तात्कालिक भरभराट झाली तरी ती शाश्वत नसते. अनियंत्रित व्यवहारांत पुढे मागें केव्हांतरी शेती मालाचे भाव बुडीचे ठरावे व शेतकऱ्याची गतकाळांतील कमाई इतर वर्गाचे हातीं जावी, हा नियम अबाधित राहिलेला आहे. गेल्या तीसचाळिस वर्षांतील जगभरचा अनुभव असा असल्यामुळे प्रत्येक देशांत पुढील मंदीच्या संभाव्य काळांत शेतकऱ्यांचें उत्पन्न कसें टिकवावें याचा विचार चालू आहे. आणि इतर व्यवहार अनियंत्रित असावे असा आग्रह धरणाऱ्या अमेरिकन सरकारासहि शेतीमालाच्या भावाबाबत उपाययोजना करणें इष्ट वाटत आहे. हिंदुस्थानांत अलीकडील कांहीं वर्षें एकंदर शेतकरी वर्गास बरीं गेलीं; कांहीं भागांतील शेतकऱ्यांस तीं विशेष भरभराटीचीं गेलीं. आपल्या नागर धनिकवर्गानें तर आतां पैसा देशांत कुठें असेल तर शेतकऱ्याचे हातींच राहिला आहे असा नवीन शोध लावला आहे. पण दूरवरचा विचार करिता आजवर झालेल्याप्रमाणें ही सुस्थितीहि क्षणभंगुरच ठरणार. कारण शेती मालाच्या पैदाशीच्या किंमती स्थिरावण्याचा सरकारचा विचार दिसत नाहीं. गेल्या दोन वर्षांत किंमतीच्या नियंत्रणाबाबत जो अविचार सरकारने दाखविला त्यामुळे शेती मालाच्या किंमतीचें भवितव्य विशेषच कठीण होऊन बसलें आहे. शेती मालाच्या किंमती येत्या वर्षात चटसाऱ्या उतरल्याखेरीज आर्थिक परिस्थिति सुधारणार नाहीं, असें अनेक उद्योगपति बोलूं लागले आहेत. शेती मालाच्या किंमती व मजुरीचे दर उतरले म्हणजे आपणांस सार्वराष्ट्रीय स्पर्धेत टिकाव धरतां येईल अशीहि भाषा ऐकूं येऊं लागली आहे. पण शेती मालाच्या किंमती एकदां घसरूं लागल्या म्हणजे त्यांना कोठेंतरी निश्चित सांवरण्याची योजना मात्र कोणी विचारांत घेऊं इच्छित नाहीं. अर्थात् शेती मालाच्या किंमती स्थिरावणें हें सोपें नाही. याकरिता योजना दीर्घ विचाराने बसविली पाहिजे; व ती पार पाडण्यास बराच पैसा व बरेच व्यवहार नियंत्रित करण्याची तयारी हवी. हा विचार, हा पैसा व ही तयारी सरकारची नसल्यामुळे मंदीच्या काळांत शेतकरी अनियंत्रित खाजगी व्यवहाराच्या वावटळींत पुन्हा सांपडणार हें खचित. हें सर्व खाजगी व्यक्तिद्वारा आर्थिक प्रगति घडवून आणण्याचा निर्णयांत अभिप्रेत आहे, व त्यांत अटळ आहे हें लक्षांत आणलें पाहिजे.

हिंदुस्थान सरकारच्या गेल्या दोन वर्षांतील आर्थिक धोरणाच्या कांहीं विशेषांचा हा आढावा झाला. यावरून सुरवातीस निर्देशिलेल्या जागतिक परिस्थितींत हिंदुस्थानचें स्थान कोणतें हें कळण्यास मदत होईल. रशियाचा साम्यवाद हिंदुस्थान सरकारला मान्य नाही, हें उघड आहे. इतकेंच नव्हे तर पश्चिम यूरोपीय राष्ट्रांनी स्वीकारिलेला समाजवादहि हिंदुस्थानांत अंमलांत येण्याचा कांहीं संभव नाही. शेती

मालाच्या किंमती वगैरे बाबतींत हिंदुस्थान सरकारचें धोरण अमेरिकेपेक्षाहि निष्क्रीय आहे. म्हणजे कितीहि कायदे केले व केवढ्याहि घोषणा केल्या, तरी आर्थिक प्रगति खाजगी साहसी व्यक्तींमार्फत घडवून आणण्याचा निर्णय घेतल्यामुळे आधीच धनिक असलेल्यांचा धनसंचय वाढूं देणें, प्रत्यक्ष कराचा बोजा कमी करणें व इतर वर्गांस तौलनिक दृष्टया डोकें वर काढूं देण्यास वाव न देणें या सर्व गोष्टी अपरिहार्य झाल्या आहेत. इतर सर्व बाबींप्रमाणें आर्थिक व्यवहारांत स्वराज्यप्राप्तीने कांही फरक झाल्यासारखा दिसत नाही. १९२० सालापासून आपल्या देशांतील व्यापारी-कारखानदार वर्गांच्या हातांतील आर्थिक बळ व राजकीय सामर्थ्य हीं सारखीं वाढत आहेत. हीं अशींच पुढें वाढत राहणार; निदान तीं अशींच पुढे वाढत रहावी असें धोरण सरकार स्वीकारणार.

## आर्थिक धोरण आणि राजकीय भवितव्य

सरकारचें आर्थिक धोरण कितपत यशस्वी व लोकमान्य होतें यावर आपलें राजकीय भवितव्य बव्हंशीं अवलंबून आहे. प्रचलित अर्थव्यवहारहि कांही काल धड चालू राहतात किंवा नाही या प्रश्नाचा प्रस्तुत निबंधांत विचार केलेला नाही. युद्धाच्या शेवटीं आर्थिक परिस्थिति साधारण बरी असतांहि हल्लींच्या सरकारने ती स्वतःच्या हाताने इतकी बिघडविली आहे कीं लवकरच एखादें अरिष्ट येण्याची भीति अनेकांस आज वाटत आहे. मोठा आघात होऊन अर्थव्यवहाराचा गाडा लवकर मोडून पडेल, हें मला संभाव्य वाटत नाही; आर्थिक दुःस्थिती सारखी चिघळत राहून जास्त जास्त बिघडेल याची मात्र शक्यता फार आहे. असें झालें असतां हल्लींच्या सरकारला आपला दशवार्षिक कार्यक्रम पार पाडतां येईल काय व न आल्यास आर्थिक धोरण व राजकीय हवामान कोणत्या दिशेने पालटण्याचा संभव आहे, हे प्रश्न खऱ्या महत्त्वाचे आहेत.

सरकारी धोरण टिकणें हें, हल्लींच्या दिवसांत, एकपक्षीं सरकारी सामर्थ्य व दुसऱ्या पक्षीं जनतेचें सहकार्य किंवा निदान संमति यावर अवलंबून असतें. आजच्या आर्थिक धोरणास जनतेची संमति मिळेल काय? कुळकायद्यांनी कांही शेतकऱ्यांचें तात्पुरतें समाधान झालेंसें दिसेल. पण खरी परीक्षा मंदीच्या वेळी त्याला आर्थिक स्वास्थ्य लाभतें किंवा नाही यावरच अवलंबून राहील. मजुराला तात्पुरती महागाई किंवा जादा वेतन कितीहि मिळालीं तरी त्याचा खरा अभिप्राय धनिकांच्या वाढत्या चलतीस किती आळा बसतो असें त्यास वाटतें यावर अवलंबून राहील. एकंदर जगांतील अलीकडील इतिहास पाहिला तर राजकारण स्थिरावण्यास आर्थिक धोरण दोन प्रकारें यशस्वी व्हावें लागतें. एक तर सर्व वर्गांस किमान स्वास्थ्य लाभण्याच्या योजना सरकार अंमलांत आणीत आहे असें कळावें लागतें; व दुसरें म्हणजे, बहुजन हाल अपेष्टेंत असतां धनिकवर्गाच्या चैनीलाहि कांही आळा बसला आहे असें दिसावें लागतें.

पहिलें स्वास्थ्य प्रत्यक्ष शारीरिक, दुसरें तितकेंच महत्त्वाचें मानसिक. इंग्लंड व स्कँडेनेवी देशांत या दोन्ही दिशांनी जास्तींत जास्त यशस्विता सरकारी धोरणास लाभली आहे. आपल्याकडे यांतील कोणत्याच दृष्टीने आर्थिक धोरणाची आंखणी होण्याचा संभव नाही. समाजस्वास्थ्याच्या योजना खर्चिक व मागासलेल्या देशांत अवघड म्हणून सरकार हातीं घेऊं शकत नाही; उलटपक्षीं धनिकांवर आर्थिक धोरणाची सर्व मदार असल्यामुळे त्यांवर हुकमत चालविण्यापेक्षा त्यांची मनधरणी करणेंच सरकारला आवश्यक भासत आहे. तेव्हा बहुजनसमाज सरकारच्या आर्थिक धोरणाचा विचार करतांना 'कस्यार्थ' हा प्रश्न विचारणार व त्याचें, केवळ धनिकांच्या एवढेंच उत्तर विचारांतीं मिळणार हें स्पष्ट आहे.

## व्यक्तिस्वातंत्र्याचें महत्त्व

आर्थिक वादास जोडून अेक राजकीय वाद, व्यक्तिस्वातंत्र्याबाबतचा, सुरवातीस निर्देशिला; परंतु त्याचें आपल्या देशांत खरोखर फारसें महत्त्व नाही. राज्यघटना मूलतः बदलल्याशिवाय समाजव्यवस्था अगर अर्थव्यवस्था यांत क्रांतिकारक फरक घडवून आणतां येतात असा अनुभव अिंग्लंड देशाचा आहे; आणि म्हणून तेथे, व्यक्तिस्वातंत्र्याची पायमल्ली करून, रक्तपात घडवून, तातडतोब क्रांति करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, सनदशीर मार्गाने दडपण आणून अिष्ट ते बदल घडवावे याकडे बहुजनांचा कल असणें स्वाभाविक आहे. पण अिंग्लंडची परिस्थिति अपवादात्मक मानिली पाहिजे. सत्ताधाऱ्यांत समजूतदारपणा, व बहुजनांत संयम या दोन्ही गोष्टी अनुकूल असल्याखेरीज अितिहासाचा ओघ असा वळत नाही. अिंग्लंडमध्ये आज अमेरिकेपेक्षाहि जास्त खरें व्यक्तिस्वातंत्र्य पाहावयास मिळतें अशी ग्वाही सर्व देतात. अिंग्लंडच्या जोडीस फक्त स्कँडेनेवी देशांस बसवितां येतें. इतरत्र उदारमतवादी लोकशाही म्हणविणाऱ्या सरकारांची वागणूक फारशी स्पृहणीय नाही. यांतहि क्रम गरीबीप्रमाणें लावतां येतो. अमेरिकी गटाच्या यूरोपीय राष्ट्रांत हा क्रम फ्रान्स, इटली, ग्रीस असा लावतां येअील. इटली, ग्रीसमधील राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याची परिस्थिति पाहतां स्वतःस उदारमतवादी म्हणविणाऱ्या अनेक अमेरिकन मुत्सद्द्यांस मोठा पेच पडला आहे. कम्युनिस्ट गटांत हीं राष्ट्रें जाऊं नयेत म्हणून त्यांस आर्थिक मदत करणें श्रेयस्कर हें खरें, पण ही आर्थिक मदत परिणामीं कर्मठ सनातनी, मोठ्या भांडवलवाल्यांचे गट व राजकीय हुकुमशाहीचे पुरस्कर्ते व चालक यांसच बलवान बनविते; व असें झालें म्हणजे अमेरिकी भांडवलशाही साम्राज्यवादी आहे या कम्युनिस्ट प्रचारास साहजिकच बळकटी येते. आपल्या देशांतील सरकारने गेल्या दोन वर्षांत जे अधिकार स्वतःस प्राप्त करून घेतले व जें व्यक्तिस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य याबद्दल धोरण ठेवलें त्यावरून त्यासहि उदारमतवादी म्हणतां येत नाही. आपणांस तत्त्वतः करडा विरोध

होऊं लागला म्हणजे सर्व राज्यकर्ते व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काच्या मर्यादा उल्लंघितात; जो आपणास योग्य वाटतो त्या पक्षांचें अस्तित्वच धोक्यांत आल्यास तें टिकविण्या-करितां सगळेच आपणांस उपलब्ध असलेलीं सर्व अस्त्रें योजतात. यांत साधु व असाधु निवडिणें हें उडदामाजीं काळेगोरे निवडण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच ठरतें. व्यक्ति-स्वातंत्र्यास अमुक जास्त महत्त्व देतात, अमुक जास्त सहिष्णु अगर अहिंसात्मक आहेत, या दाव्यांकडे लक्ष न देतां, इष्ट फरक शांततामय मार्गानें घडवून आणण्याचा प्रत्यक्ष संभाव्यतेचाच विचार करूं.

## आर्थिक विसंगति

निर्विकार मनाने पाहिलें असतां सर्वच बाबतींत आपल्या देशाची परिस्थिती ग्रीस, स्पेन व चीन अशा देशांशींच विशेष तुलनीय ठरते. या सर्व देशांत गेल्या वीस-पंच-वीस वर्षांतील आर्थिक इतिहासांत एक चमत्कारिक विसंगती प्रत्ययास येत आहे. समाजवाद व साम्यवादाचा अंमल शांततेने घडवून येण्यास परिस्थिती जेथे अनुकूल तेथे त्याची आवश्यकता कमी तीव्र व जेथे आवश्यकता विशेष तेथे बंडाळी शिवाय अर्थव्यवस्था बदलणें कमी संभाव्य, अशी ही विसंगती आहे. अत्यंत अल्पसंख्यां-कांचे हातीं राष्ट्रीय संपत्तीचा मोठा भाग केंद्रित होणें, थोड्या धनिकांचे हातीं सर्व अर्थव्यवस्थेची किल्ली असणें, भीषण गरीबी व बेसुमार श्रीमंतीचें साहचर्य राहणें, या गोष्टींच्या निराकरणाकरितां सर्व प्रमुख अर्थव्यवहार सरकारी करणें आवश्यक मान-ण्यांत येतें, परंतु जेथे खरोखर अशी परिस्थिति असते तेथे समाजवाद चटकन अंमलांत आणणें फार कठीण असतें. याचे उलट जेथे सार्वजनिक राहणीचें मान बरें, आर्थिक विषमता कमी, भांडवलवाल्यांत कार्यक्षम उत्पादनाची व सचोटीची परंपरा अधिक तेथे समाजवादाच्या दिशेने प्रगतीहि अधिक लवकर होते.

आज इंग्लंडमधील राष्ट्रीयीकरणाच्या विरोधी अनेक लेखक इंग्लंडमध्ये राष्ट्रीयी-करण अनावश्यक आहे असें मुख्यतः प्रतिपादतात. त्यांचे मतें आज इंग्लंडमधील सर्व मोठे उद्योगधंदे कोणा व्यक्तींच्या ताब्यांत राहिले नसून मोठ्या सार्वजनिक मंडळ्यांच्या मालकीचे आहेत, या मंडळ्यांतील भागीदार बहुसंख्य व देशभर पसरलेले आहेत, व यांचा कारभार कोणाहि एका व्यक्तीच्या अगर गटाच्या हुकमती-खालीं अगर हिताकरितां चालत नाही. मंडळीने उत्पादन किफायतशीर व्हावें याकडे जरी लक्ष ठेवलें, तरी मजुरांचें समाधान, राष्ट्रीय संपत्तीचा योग्य विनियोग व सुरक्षितता, उत्पादनाचा उच्च दर्जा, शास्त्रीय संशोधनाची प्रगति इत्यादि अनेक बाबी या मोठ्या मंडळ्या तितक्याच कसोशीने सांभाळतात. तसेंच मंडळ्यांच्या भागावर वांटण्यांत येत असलेला नफा इतका अल्प व एकंदर करपद्धतीमुळे व जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपाच्या नियंत्रणामुळे प्रत्यक्ष आर्थिक विषमता इतकी कमी कीं, राष्ट्रीयीकरणामुळे कोणत्याच दृष्टीने इष्ट फरक घडून येण्याची शक्यता

ठरलेली नाही. इंग्लंडांत राष्ट्रीयीकरण इष्ट आहे किंवा नाही याचा आपणास विचार करावयाचा नाही. परंतु, तेथील विरोधकांच्या विधानांत कांही अंशीं तथ्य आहे; इतकेंच नव्हे तर विरोधकांची भूमिकाहि खाजगी व्यक्तीचे हातांत मोठा धनसंचय असणें, मूठभर साहसी व्यक्तींची हुकमत अर्थव्यवहारावर चालणें किंवा राहणीच्या मानांत मोठी विषमता असणें या गोष्टी समर्थनीय आहेत अशी नाही. त्यांचे मतें या दृष्टीने आधींच इतकी प्रगति झाली आहे कीं जास्त घडवून आणण्यास राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता नाही.

## आपल्या आर्थिक सत्तेचे सूत्रधार

याच्या उलट हिंदुस्थानांतील परिस्थिती आहे. येथे उद्योगधंदे फार थोड्यांच्या हातीं व हे सर्व कांहीं विशिष्ट गटांतले. "हरिजन" मध्यें कांही महिन्यांपूर्वी एका उद्योगपतीचें पत्र प्रसिद्ध करण्यांत आलें. त्यांत खाजगी भांडवलवाले प्रांतीयतेच्या विरुद्ध आहेत असें म्हटलें. एका दृष्टीने हें खरेंहि आहे. कारण त्यांतील कोणाचीच दृष्टी आपलें कुटुंब, सगेवाले अगर भागीदार यांच्या पलीकडे जाऊं शकत नाही. निरनिराळ्या प्रकारें सार्वजनिक मदतीने वाढलेल्या अगर चाललेल्या सर्व हिंदी उद्योगधंद्यांतील मुख्य फायदा, त्यांच्या व्यवहाराची सर्व मलई, किती थोड्या व्यक्तींना मिळते व ती सर्व विशिष्ट गटांत राखण्याचीं साधनें काय याबद्दल चौकशी करणें राष्ट्रीय धोरणाच्या दृष्टीने आज खरोखर फार महत्त्वाचें आहे. अमेरिकेंत अशी चौकशी फार तपशीलवारपणें लढाईपूर्वीच करण्यांत आली. इंग्लंडांत एकाच धंद्यांत– वर्तमानपत्राच्या–थोड्या व्यक्तींच्या हातीं हुकमत असल्याचें आढळलें. तेथेहि या धंद्याबाबत नुकतीच चौकशी झाली. हिंदुस्थानांत असल्यापैकीं कोणतीच चौकशी होऊं घातल्याचें ऐकिवांत नाही. आर्थिक सत्ता फार थोड्यांचे हातीं आहे एवढेंच नव्हे तर तिचा उपयोगहि केवळ व्यक्ति-फायद्यावर व गटाच्या सामर्थ्याचे वाढीवर लक्ष ठेवूनच केला जातो. अर्थव्यवस्थेस किफायत-व्यवस्था कांही अर्थशास्त्र क्वचित म्हणतात. हिंदुस्थानांत हें अक्षरशः खरें आहे. आपली व्यवस्था खरी उत्पादन-व्यवस्था नाही. जास्तींत जास्त उत्पादन, चांगलें उत्पादन, कमी खर्चाचें उत्पादन, राष्ट्रीय संपत्तीच्या दृष्टीने युक्त उत्पादनपद्धति ही दृष्टि आपणाकडे अभावाने दिसेल. उत्कृष्ट व प्रामाणिक कारखानदार म्हणून हिंदुस्थानांत कीर्ति मिळविणारे, बहुतेक उद्योगधंद्यांत, अजूनहि परकीयच आहेत. बाजार तेजीचा असला म्हणजे वाईट माल गिऱ्हाइकाचे माथीं मारून स्वतःच्या देशांतच नव्हे तर परदेशांतहि अनेकवार हिंदी कारखानदार व व्यापाऱ्यांनी अप्रतिष्ठा मिळविलेली आहे. कर चुकविणें, सरकारी नियंत्रणें पद्धतशीर रीतीने मोडणें, वजनामापांत, किंमतींत गिऱ्हाइकास फसविणें, सांठेबाजी–सट्टेबाजी करणें, एवंच सर्व तऱ्हेच्या लबाड्या करणारे प्रत्येक देशांत आढळतात. देशादेशांतील मुख्य फरक म्हणजे ते केवढ्या प्रमाणांत व कोणत्या थरांत

आढळतात याबद्दलचा. खन्या पुढारलेल्या देशांत हे अल्प असतात इतकेच नव्हे धुरीण समजल्या जाणाऱ्यांच्यांत असे सहसा सांपडत नाही. चीन, हिंदुस्थानसारख्या देशांत लहान-मोठे सगळेच एका माळेचे मणि, किंबहुना जेवढा मोठा धनिक तेवढा त्याचा दुर्लौकिकहि मोठा अशी बऱ्याच वेळेस परिस्थिती असते. आणि चीन हिंदुस्थानमधील आर्थिक धोरणाचे खरे सूत्रधार हेच. ज्यांना समाजकंटक म्हणून साक्षेपाने वगळावे ते आमच्या राजधानींत मोठे मानाचे सल्लागार म्हणून मिरवितात.

असें असतां शांततेने बदल कसे घडून यावे ? आजचें सर्वच राजकीय-आर्थिक धोरण विशिष्ट वर्गाच्या हितांकरिता कसें आंखलें जात आहे याचा अनुभव मुंबईकडे दृष्टि फेकली असतांहि सहज येतो. खडकवासले, वीर सारखी धरणें उंच करण्यास पैसा नाहीं पण मुंबईत दूधवाडी व निर्वासितांची घरें याकरितां कोट्यावधि रुपये ओतले जातात. प्राथमिक उत्पादन व प्राथमिक उत्पादक यांचें महत्त्व सरकारच्या लक्षांत येण्याचें कारण नाही, निदान त्यांची खरी भरभराट हा आर्थिक धोरणाचा खरा उद्देश नाही. मुंबईची वाढ भरमसाट होऊं द्यावयाची, मग त्याचें अनिष्ट परिणाम सांवरण्याकरिता कोटींनीं खर्च करूं पाहावयाचें. पण सार्वत्रिक प्राथमिक उत्पादन वाढेल व केंद्रांत फाजील सांचलेला उद्योग व पैसा देशभर कांही प्रमाणांत फैलावेल याचा विचार करावयाचा नाही. याचें कारण याबद्दल खरी कळकळच नाही. विकेंद्रीकरण खरें झालें तर दोनचार शहरांतल्या मूठभर लोकांची हुकमत कशी टिकेल ?

## राजकीय संक्रमण शांततेने होणें दुरापास्त

राजकीय मतौघ असाच वहात आहे. स्थानिक स्वराज्य संस्था नव्हे तर प्रांतिक सरकारेंहि दुर्बल करावी, मध्यवर्ति सरकारची सत्ता हरतऱ्हेने वाढवावी, लढाईचीं रूपकें वापरून अंधश्रद्धा व अंधानुयायित्व यावर भर द्यावा हेच प्रकार सर्वत्र दिसतात. भांडवलवाल्यांची आर्थिक सत्ता व राजकीय हुकुमशाही यांचें साहचर्य सर्वत्रच असतें. त्यांत आतां या रूसी-अमेरिकी लढ्याने आयतेंच फावलें आहे. आदिवासी असंतुष्ट झाले, लहान बागाइतदार चिडले, किंवा निर्वासित चिथरले तर सर्व कम्युनिस्टांमुळें. सरकारवर जबाबदारी कांहीच नाही. यापुढे हळूहळू सरकारचा प्रत्येक उघड अगर प्रच्छन्न टीकाकार कम्युनिस्टजमा आहे असें सरकारचे पोलिस समजूं लागणार हें उघड आहे. या परिस्थितीबाबत आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. इतर सर्व तुल्य देशांत ती अशीच आहे. आणि आतां अमेरिकी मदत जास्त येऊं लागली म्हणजे ती एका दृष्टीने आणखीच बिघडेल; कारण सत्ताधारी आज आहेत त्यापेक्षाहि कमी लोकाभिमुख होतील. मोठ्या राष्ट्रांच्या पाठबळाने सार्वराष्ट्रीय कम्युनिस्ट आघाडीच्या निमित्ताने त्यांचें लष्करी सामर्थ्य वाढेल व आसनहि पुष्कळ वर्षे स्थिरावूं शकेल.

कोणता पक्ष किती वर्षे आसनस्थ राहील हा विषय नाही ! त्याबद्दल बोलण्याचा माझा अधिकारहि नाही. गेल्या दोन वर्षांतील आर्थिक धोरणाच्या इतिहासावरून मला एवढेंच वाटतें कीं, या देशांत संक्रमण शांततेने होण्याची चिन्हें दुरावूं लागलीं आहेत, किंबहुना दुरावलींच आहेत. दोन वर्षांपूर्वी मी याबाबत आशावादी होतो. व्यापारी-कारखानदार वर्गाकडून कांही समजूतदारपणा दाखविला जाईल असें मला वाटलें नव्हतें; परंतु राजकीय पुढारी, मोठे सरकारी अधिकारी व एकंदर शिक्षित पांढरपेशा-पैकीं महत्त्वाच्या व्यक्ति यांना परिस्थितीचें यथार्थ आकलन होऊं शकेल असें वाटत होतें. त्यांतल्यात्यांत युद्धकालीन नियंत्रणाचा गाडा मागील सरकारनें आयताच चालू करून दिलेला असल्यामुळे विनासायास बऱ्याच गोष्टी करतां येण्यासारख्या होत्या. पण माझा आशावाद फाजिल ठरला. कम्युनिस्ट म्हणतील कीं तो फाजील नव्हे तर केवळ स्ववर्ग वृथाभिमानद्योतक होता. तें कांही असो. राजकारणावर निवडणुकींच्या आधीं पडलेला पैशाचा प्रभाव फार टिकाऊ ठरला; अर्थात्, परिस्थिती इतकी विषम व बिकट असतां केवळ कांही राजकीय 'पुढाऱ्यांच्या' व अधिकाऱ्यांच्या जोरावर तींत मूलभूत फरक घडून येऊं शकतील ही आशा फोल ठरली. दिवसेंदिवस ही परिस्थिति सुधारणें कठीण होऊं लागलें आहे. यापुढें सत्ताधिकाऱ्यांचा व धनिकांचा उन्माद कमी होण्याचीं चिन्हें नाहींत, तो वाढणार; सत्ता टिकविण्या-करिता, असंतोषाचीं चिन्हें दडपून टाकण्याकरिता हरतऱ्हेचे प्रयत्न होणार. या सर्व लढ्यांत कोणास कांहीहि यश तत्कालिक येवो अगर न येवो एकंदर मनांतल्या आढ्या व असंतोष, वर्गावर्गांतील, जातीजातींतील अप्रीति व कलह वाढणार के आधींच कारभारांत आलेल्या ढिलाईचें पर्यवसान वाढत्या अराजकांत होणार असा धोका आज उघड दिसत आहे. परिणामीं या मंथनांतून हालाहल निघो वा अमृत निघो मध्यंतरींचा काळ कठीण जाणार हें खचित. ● ● ●

X.2.N5
H9
10772

# कै. गजेन्द्रगडकर संदर्भ ग्रंथालय

हें ग्रंथालय दि. १५ आगस्ट १९४२ सोमवारीं स्थापन करून ८ नोव्हेंबर रोजीं कै. गजेन्द्रगडकरांच्या दुसऱ्या स्मृतिदिनीं त्याचें उद्घाटन करण्याचें ठरविलें आहे. या ग्रंथालयाने संघाच्या एक आवश्यक व उपयुक्त कार्याची उभारणी होणार आहे.

पुढील प्रकारांनी आपण मदत करावी.

(१) संदर्भ ग्रंथालयाला उपयोगी अशीं आपल्याजवळ जर कांही पुस्तकें असतील तर तीं संघाला द्यावींत.

(२) द्रव्य रूपाने देणगी द्यावी.

(३) पुस्तकें ठेवण्यास कपाटें घेण्याकरिता द्रव्य द्यावें. एका कपाटास साधारणतः रु. २०० ते २२५ खर्च येणार आहे. आपण इतकी रक्कम दिल्यास आपल्या नांवाची पट्टी कपाटावर लावण्यांत येईल.

मुंबई मराठी साहित्य संघ

सरस्वती, गिरगांव, मुंबई ४

# मुंबई मराठी साहित्य संघाचीं प्रकाशनें

## (१) वामन मल्हार : वाङ्मयदर्शन

लेखक : प्रा. वा. ल. कुळकर्णी, एम्. ए. कै. वा. म. जोशी यांच्या साहित्याचें रसग्रहण करणारें एकमेव पुस्तक.

मूल्य ३ रुपये

## (२) अर्वाचीन मराठी काव्य

लेखक : प्रा. रा. श्री. जोग, एम्. ए. आधुनिक काव्याच्या अभ्यासकांना हें पुस्तक अतिशय उपयुक्त आहे.

मूल्य ५ रुपये

## (३) प्रि. धनंजयराव गाडगीळ यांचें

संघदिन १९४९ सालचें "आपलें आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य" या विषयावर झालेलें भाषण संघकार्यालयांत विकत मिळेल.

मूल्य ४ आणे

संघ कार्यालय, सरस्वती, गिरगांव, मुंबई ४

मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने

# साहित्य

## (द्वैमासिक)

### ऑगस्ट १९४९ अंकापासून तिसरें वर्ष सुरू होईल

वार्षिक वर्गणी पांच रुपये

किरकोळ अंक १२ आणे

### प्रथम वर्षाचे बांधणी केलेले आठ अंक कार्यालयांत मिळतील

★

मुंबई मराठी साहित्य संघ

सरस्वती, गिरगांव, मुंबई ४

प्रकाशक : डॉ० अ. ना. भालेराव, संयुक्त कार्यवाह मुंबई मराठी साहित्य-संघ

सरस्वती–गिरगांव–मुंबई ४

मुद्रणालय : राष्ट्रवैभव प्रेस, प्रार्थना समाज गिरगांव मुंबई ४.